# दयाळू रतन टाटा आपल्यातून निघून गेले


दैनिक बीड


# पुण्यभूमी

संपादकःबाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड गुरूवार,दि.१०ऑक्टोबर २०२४|वर्षे४रे | अंक६८वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३



## उद्योजक रतन टाटांनी घेतला जगाचा निरोप!

### दुःखद: उपचार घेत असतांना प्राणज्योत मावळली

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

उद्योगपती व टाटा सन्सचे माजी चेअरमन रतन टाटा यांचं वयाच्या ८६ व्या वर्षी निधन झालं आहे. गेल्या काही दिवसांपासून त्यांची प्रकृती चिंताजनक होती. प्रकृती खालावल्यामुळे त्यांना बुधवारी मुंबईतील ब्रीच कॅन्डी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. मात्र, उपाचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली.

महत्त्वाचे म्हणजे तीन दिवसांपूर्वीही रतन टाटा यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे वृत्त होते. मात्र, रतन टाटा यांनी स्वत: सोशल मीडियावर एक निवेदन जारी करत यासंदर्भात खुलासा केला होता. ही बातमी अफवा असल्याचे त्यांनी या निवेदनात म्हटलं होतं. माझ्या वयामुळे आणि वैद्यकीय कारणांमुळे सध्या माझी वैद्यकीय तपासणी सुरु आहे, असेही त्यांनी सांगितलं होतं. मात्र, आज दुपारपासून त्यांची प्रकृती खालावली. त्यामुळे त्यांना मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालात दाखल करण्यात आले होते. मात्र रात्री उशीरा त्यांचे निधान झालं.रतन टाटांच्या निधनाचं वृत्त प्रसिद्ध होताच अनेक नेत्यांनी व कलाकारांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली आहे. ज्येष्ठ नेते शरद पवारांनी देखील रतन टाटांना पान २ वर...

# ऐनवेळी परवानगी नाकारली

## डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नावासाठी भीम अनुयायी उतरले रस्त्यावर!

- बीड रेल्वे स्टेशनला डॉ. बाबासाहेब आंबेडकर रेल्वे स्टेशन असेच नाव राहील!
- बाबासाहेबांच्या नावासाठी आंबेडकरी जनतेने ठाण मांडून
- बीडमध्ये आंबेडकरी कार्यकर्त्यांना पोलिसांनी ठेवले नजरकैदेत
- आंदोलन संपवून टाकण्याचा प्रशासनाआडून डाव हाणून पडणार
- आम्ही शांततेत आंदोलन करतो आहोत, दबाव टाकण्याचा प्रयत्न का?









बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड रेल्वे स्टेशनला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात आले आहे. या नावाची नोंद घेण्यात यावी अशी मागणी आंबेडकरी जनतेने लावून धरली आहे. बुधवारी आंबेडकरी जनतेकडून त्या संदर्भात मोर्चाचे आयोजन करण्यात आलं होतं. मात्र बीडमध्ये राज्यपाल यांचा दौरा आल्यानं पोलीस प्रशासनाकडून मोर्चाला परवानगी नाकारली होती. परंतु ज्या लोकांपर्यंत हा निरोप पोहोचला नाही ते भीम अनुयायी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापाशी जमा झाले होते.या मोर्चासाठी येणाऱ्या गाड्या पोलिसांनी त्या त्या ठिकाणी अडवून अनुयायांना रोखण्याचं काम केलं आहे. आम्ही रीतसर परवानगी मागून देखील परवानगी देण्यात आली नाही. बुधवारी सकाळपासूनच मुख्य आंदोलन कर्त्यांना पोलिसांनी त्यांच्या घरातून ताब्यात घेऊन दिवसभर नजर कैदेत ठेवलं होतं. त्यामुळे सरकार आणि पोलीस प्रशासनाच्या विरोधात आंबेडकरी जनतेने रोष व्यक्त केला. पान २ वर...

### आज पून्हा बैठक

बीड प्रशासनाकडून आंबेडकरी जनतेचे आंदोलन दाबण्याचे षडयंत्र रचले जात आहे.परंतु शेवटपर्यंत आमचा लढा कायम राहील.म्हणून बीड रेल्वे स्टेशनला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यासाठी समाज मोठ्या प्रमाणात रस्त्यावर उतरणार आहे.त्यासाठी आज मोर्चाची तारीख ठरवण्यासाठी आंबेडकरी जनतेकडून बैठक बोलावण्यात आलेली आहे. त्या बैठकीतून राज्यभरातून भीम अनुयायांना बीडमध्ये येण्याचे आवाहन करण्यात येणार आहे.

### पोलिसांनी गुन्हे दाखल करून वातावरण बिघडून टाकू नये!

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ भीम आहे मोठ्या संख्येने शांततेत जमा झाले होते.पोलीस प्रशासनाला आम्ही शांततेत आंदोलन करतो आहोत. याला गालबोट लावण्याचे काम करू नका असे वारंवार आंबेडकरी जनतेकडून सांगण्यात येत होते. परंतु असे असताना पोलिसातील एक कर्मचारी आंदोलनात सहभागी असलेल्या विद्यार्थ्यांचे नावे विचारपूस करून नोंदवून घेत होता. यावेळी आंदोलनकर्ते म्हणाले ते विद्यार्थी आहेत गनिमी कावा करून त्यांच्या विरोधात खोटेनाटे गुन्हे दाखल करू नयेत. कारण आम्ही लोकशाही मार्गाने बाबासाहेबांच्या पुतळ्यापाशी बसलो आहोत. जाणीवपूर्वक तेढ निर्माण करत असाल तर याचे दूर गामी परिणाम उमटतील. त्यामुळे पोलिसांनी सामंजस्य भूमिका ठेवावी. अशी मागणी आंबेडकरी जनतेने केली.

## सोलर हायमास्टने बीड शहर उजळणार

### विकास: धनंजय मुंडेंचे डॉ.योगेश क्षीरसागरांकडून आभार

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

शहरातील नागरिकांच्या मागणीनुसार विजेचा प्रश्न सोडविण्यासाठी डीपीसीतून ६ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यातून २५० सोलर हायमास्ट बसविण्यात येणार असल्याने शहर उजळणार आहे. यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या पाठपुराव्यातून निधी मिळाला असून पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांचे भरीव निधी दिल्याबद्दल आभार मानले आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार, पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून बीड विधानसभा मतदारसंघातील शहर व ग्रामीण भागासाठी कोट्यवधींचा निधी मिळाला आहे. त्यातील



अनेक विकासकामे प्रगतीपथावर आहेत. अलिकडे शहरातील अनेक भागात पथदिवे बंद असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी होत्या. हे पथदिवे सुरू करून अंधार दूर करावा, अशी मागणी नागरिकांमधून होत होती. या मागणीची दखल घेऊन डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्याकडे पाठपुरावा केला. त्यानंतर डीपीसीतून ६ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला असून त्यातून २५० सोलर हायमास्ट बसविण्यात पान २ वर...

## बीडमध्ये राज्यपालांनी साधला संवाद!

### नियोजन : दिवसभर ठेवला होता चोख बंदोबस्त

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी आज बीड जिल्हा दौऱ्यात शासकीय विश्रामगृह येथे लोकप्रतिनिधी, विविध राजकीय पक्षांचे प्रमुख नेते तसेच वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांच्याशी जिल्ह्यातील विविध विकास विषयक प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. तसेच उद्योग, संस्कृती, पर्यटन, साहित्य, माध्यम, उद्योजक तसेच विविध समाज घटकांशी संवाद साधून त्यांच्या जिल्ह्यांच्या विकासाबाबत असलेल्या अपेक्षा, अडचणी व संकल्पना जाणून घेतल्या.

यावेळी आमदार संदीप क्षीरसागर, आमदार नमिता मुंदडा, माजी आमदार सय्यद सलीम, माजी आमदार ड. उषा दराडे यांच्यासह विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी अविनाश पाठक,



जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने, जिल्हा पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी,प्रशिक्षाणार्थी सहाय्यक जिल्हाधिकारी अर्पिता ठुबे यांच्यासह विविध विभागाचे प्रशासकीय प्रमुख उपस्थित होते.

राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांच्या समोर मान्यवर व्यक्तींनी शेतकरी प्रश्न, सिंचन अनुशेष, जिल्हयातील पायाभूत सुविधा. 'उद्योगांसाठी पोषक वातावरण, ऊसतोड मजूरांचे स्थलांतर, आरोग्याच्या सुविधा, शहरातील पान २ वर...

## २५ कोटीच्या रस्ता कामाचे उदघाटन

### विकास: आ.लक्ष्मण पवारांमुळे रुपडे पालटले



गेवराई पुण्यभूमी प्रतिनिधी

मतदारसंघात आ.लक्ष्मण पवार यांच्या प्रयत्नातून मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी आ.लक्ष्मण पवार यांनी मोठ्या प्रमाणात निधी खेचून आणुन मोठ्या प्रमाणात विकास कामे सध्या मतदारसंघात सुरु आहेत .त्या अनुषंगानेच मतदारसंघातील माजलगाव तालुक्यातील राममा ६१ ते हारकी निमगाव,रामपिपंळगाव,मगरुळ २, ६ की.मी. किंमत ६ कोटी,तालखेड फाटा ते तालखेड रस्ता ५ की.मी. किमंत ५ कोटी,माजलगाव रोड ते जाभंळी तांडा,४.५०० कि.मी. किंमत २ कोटी७० लक्ष, मतदारसंघातील बीड तालुक्यातील पेडगाव फाटा पान २ वर...

## डॉ.योगेश क्षीरसागर | सरपंच अशोक आमटेंचा राष्ट्रवादी प्रवेश

# रॅली काढून जल्लोषात स्वागत

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात इनकमिंग सुरूच आहे. बीड तालुक्यातील खांडेपारगावचे माजी सरपंच अशोक आमटे यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. हा प्रवेश सोहळा खांडेपारगाव येथे पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवारी (दि.९) उत्साहात पार पडला. ग्रामस्थांच्यावतीने डॉक्टर दाम्पत्याचे फुलांची उधळण करत हलगीच्या तालावर जल्लोषात स्वागत करण्यात आले.

डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या



नेतृत्वावर विश्वास ठेवून बीड विधानसभा मतदारसंघातील दररोज प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते पक्षात प्रवेश करून खंबीर साथ देत आहेत. माजी सरपंच अशोक आमटे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना.अजित पवार, पालकमंत्री ना.धनंजय पान २ वर...

### बीड मतदारसंघाला गरज:अशोक आमटे

गेल्या दोन वर्षापासून आपण डॉ.योगेश क्षीरसागर व डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांचे राजकीय, सामाजिक कार्य पाहत आलो आहे. मतदारसंघाला विकासाच्या वाटेवर नेण्याची क्षमता त्यांच्यामध्ये आहे. त्यांच्यासारख्या नेतृत्वाची बीड मतदारसंघाला गरज असून आगामी विधानसभा निवडणुकीत आपण त्यांच्या मागे ताकद उभी करणार असल्याचे माजी सरपंच अशोक आमटे यांनी म्हटले आहे.




## अ-पक्षांचा जयो झाला

**हरियाणातील काँग्रेस नेत्यांच्या लाथाळ्यांनी भाजपला मदत झालीच; पण आधीपासूनच 'व्होटकटवे' उभे करण्याचा खटाटोप मात्र जम्मू-काश्मिरात फळला नाही**

प्रत्येक निवडणूक ही वेगळी असते आणि तरीही प्रत्येक निवडणुकीच्या निकालात काही समान धागे असतात. जम्मू-काश्मीर आणि हरियाणा विधानसभेच्या निवडणुकांच्या निकालांबाबतही हेच म्हणता येईल. या दोनही राज्यांत 'धक्का' हा एक समान धागा आहे आणि दोन्ही ठिकाणच्या धक्क्यांत अ-पक्षांचा वाटा नजरेत भरण्याइतका आहे. हा झाला विश्लेषणाचा भाग. पण कोणत्याही अन्य निवडणुकीप्रमाणे या निवडणुकीचे निकालही भविष्यासाठी काही प्रमाणात सूचक ठरतात. हे भविष्य म्हणजे अर्थातच महाराष्ट्र आणि झारखंड राज्यात होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुका. त्यावरही या निकालाच्या अनुषंगाने भाष्य आवश्यक. तत्पूर्वी या निकालांचे विश्लेषण.

यात सत्ताधाऱ्यांसाठी सुखद धक्कादायक आहे तो भाजपचा हरियाणातील विजय. सर्व पाहण्या, मतदानोत्तर चाचण्या, विविध संघटना, विश्लेषक आदींकडून प्रतिकूल अहवाल आलेले असतानाही भाजपने ही निवडणूक जिद्दीने लढवली आणि काँग्रेसच्या अतिआत्मविश्वासाने त्या पक्षाचा घात केला. काँग्रेसचा हा अतिआत्मविश्वास जाट या एका समाजघटकाविषयी होता आणि त्यामुळे त्यातून हुडा पितापुत्रांवर तो पक्ष अधिक विसंबला. जाट भाजपवर नाराज होते हे खरे. जाटांत भाजपविषयी खदखद होती हेही खरे. त्यामुळे जाट मोठ्या प्रमाणावर काँग्रेसमागे उभे राहातील हेही खरेच खरे. तसे ते राहिले देखील. परंतु काँग्रेसच्या 'जाट तितुका मेळवावा' या धोरणामुळे जाटेतर समाजघटक त्या पक्षापासून दुरावले. हे सत्य काँग्रेसच्या आता लक्षात येईल. हरियाणाचे राजकीय वातावरण जाट-केंद्री झाल्यामुळे जाटेतरांना असुरक्षित वा दुर्लक्षित वाटणे साहजिक. तसेच या दुर्लक्षितांस भाजपने जवळ करणेही साहजिक. यात साहजिक नाही ते हे साधे सत्य काँग्रेसने दुर्लक्षित करणे. तसे ते केल्यामुळे जाटेतरांची मते भाजपच्या पारड्यात गेली. हा एक भाग. तसेच या संदर्भात ही जाट मते फोडण्यासाठी भाजपने 'व्होटकटव्यां'चा वापरही अत्यंत चातुर्याने केला. भाजपच्या 'अदृश्य शक्ती'च्या आधारे या निवडणुकीत जवळपास ४०० हून अधिक फुटकळ/ अ-पक्ष रिंगणात उतरले. त्यातील बरेच जाट होते. हा योगायोग नाही. उदाहरणार्थ काँग्रेसच्या वतीने रिंगणात असलेल्या विनेश फोगट हिच्या मतदारसंघात अर्धा डझन जाट अपक्ष-रूपाने रिंगणात होते. आता विनेश हिच्या लोकप्रियतेमुळे या अदृश्य शक्ती-धारित अपक्षांवर ती मात करू शकली. अन्यांस ते जमले नाही. कारण विधानसभा निवडणुकांत मतदारसंघांचा आकार लहान असतो. अगदी हजारभर मतांनीही जय-पराजयाचा फैसला होतो. अशा वेळी या अपक्षांनी प्रत्येकी हजार-पाचशे मते घेतली तरी निकालावर परिणाम होऊ शकतो. कसा ते हरियाणातील निवडणूक निकालावरून लक्षात येईल. अर्थात भाजपच्या विजयामागे हे एकमेव कारण नाही.जे झाले त्याचा परिणाम अर्थातच महाराष्ट्र आणि झारखंड या राज्यांत होऊ घातलेल्या निवडणुकांवर होणार. या निकालांतून भाजपचा आत्मविश्वास दुणावेल, हे उघड आहे. याउलट विरोधक या निकालामुळे अधिक कावरेबावरे होऊ शकतात. या निकालात त्यांच्यासाठी अधिक मोठा धडा आहे. आधी सत्ता आणायची आणि मग मुख्यमंत्रीपदी कोण याची चर्चा करायची, हा तो धडा. हरियाणातील काँग्रेसप्रमाणे महाराष्ट्रातही शिवसेना आणि काँग्रेसचे काही अतिउत्साही या मुद्द्यावर जाहीर बरळत असतात. हरियाणातील निकालातून ते काही शिकले नाहीत तर त्या राज्याप्रमाणे महाराष्ट्रातही व्होटकटवे आणि भुरटे यशस्वी ठरतील आणि 'अ-पक्षांचा जयो झाला' असे म्हणण्याची वेळ येईल.

# हाय स्ट्रीट लॉंच करण्यासाठी भागीदारी

## धोरण:परिसीचा होणार सर्वांगीण विकास

पुणे/पुण्यभूमी प्रतिनिधी

मेस्ट्रो टेकने प्राइम वाघोली लिंक रोडवर असलेला वाघोली हाय स्ट्रीट हा नवीनतम व्यावसायिक प्रकल्प सुरू करण्यासाठी ऋ्ड समूहासोबत आपली धोरणात्मक भागीदारी जाहीर केली. पुण्यातील सर्वाधिक मागणी असलेल्या बाजारपेठेत ऐतिहासिक व्यावसायिक विकास करणे हा या समर्थनाचा उद्देश आहे, ज्यामुळे परिसराचा सर्वांगीण विकास आणि वाढ होईलवाघोली हाय स्ट्रीट, वाघोली लिंक रोड ५.५ एकर विस्तीर्ण क्षेत्रात पसरलेला आहे आणि त्यात पाच टॉवर आहेत, जे दुकाने, शोरूम आणि कार्यालयांसह विविध व्यावसायिक जागा प्रदान करतात. व्यवसायाच्या विस्तारासाठी आणि वाढीसाठी उत्साही वातावरण देण्यासाठी ही योजना तयार करण्यात आली आहे. यात एक विस्तृत हाय स्ट्रीट, योग लाउंज, बिझनेस लाउंज, गेमिंग झोन, को-वर्किंग स्पेस आणि कॅफे यासारख्या अत्याधुनिक रूफटॉप सुविधा आहेत, ज्यामुळे ते एक खरे प्रीमियम बिझनेस डेस्टिनेशन बनले आहे.




आपला उत्साह व्यक्त करताना,मेस्ट्रो रिअलटेकचे संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक नितीन गुप्ता म्हणाले, पुणे भारताच्या वाढीमध्ये आघाडीवर आहे आणि त्याच्या वाढीला समर्थन देण्यासाठी जागतिक दर्जाच्या नियामक धोरणांची कठोर अंमलबजावणी करत आहे. आहा. वाघोली हाय स्ट्रीट सुरू करण्यासाठी जीएस ग्रुपशी संलग्न होणे हा एक मोठा सन्मान आहे. हा प्रकल्प विदर्भातील रिअल इस्टेट क्षेत्रात मैलाचा दगड ठरेल, ज्यामुळे व्यवसायासाठी आणि शहराच्या सर्वांगीण विकासासाठी मोठे मूल्य निर्माण होईल.महेश सातव, संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक, जीएस ग्रुप म्हणाले, पुणे हे एक प्रमुख शहर म्हणून विकसित होत असताना, या प्रदेशाच्या अधिक विकासासाठी आणि समृद्धीसाठी आमचा असाधारण प्रकल्प प्रस्तावित आहे याची खात्री करणे ही आमची व्यावसायिक जबाबदारी आहे. व्यवसाय, उद्योजक आणि व्यावसायिकांसाठी एक आदर्श स्थान प्रदान करण्यासाठी डिझाइन केलेले केळे देखील स्थापित करा.पुण्याचे पूर्वेकडील हब असलेल्या वाघोली लिंक रोडच्या बाजूला ही योजना आहे-कनेक्टिव्हिटी आणि कनेक्टिव्हिटी: आगामी मेट्रो मार्ग, तीन मजली उड्डाणपूल, रिंग रोड आणि १२० फूट वाघोली लिंक रोड यांसारख्या प्रस्तावित पुनर्निर्मिती योजनेचा या परिसराला फायदा होईल.- प्रमुख खढ हबशी जवळीक: प्रकल्पात खराडी एजछ खढ पार्क आणि वर्ल्ड ट्रेड सेंटर सारखे खढ हब क्षेत्र आहेत.-एक्सप्रेस प्रवेश: जवळील समृद्धी एक्सप्रेस कनेक्टिव्हिटी आणि वाहतूक मार्गांचा उत्कृष्ट प्रवेश व्यवसाय आणि व्यावसायिकांसाठी स्थान आदर्श बनवतो.-गुंतवणुकीची संधी: वाढती पायाभूत सुविधा आणि धोरणात्मक स्थान गुंतवणूकदारांसाठी आकर्षक आहे, ज्यामध्ये कार्यालये, स्वयंपूर्ण जागा आणि बुटीक शोरूम आहेत. किंवा करारासह, गुंतवणूकदार ॢ गुळगुळीत वाढ आणि उत्कृष्ट उच्च ठजख ची अपेक्षा करू शकतात. वाघोली प्रकल्पाची दुकाने, को-वर्किंग मशिन्स आणि व्यावसायिक व्यावसायिक दुकाने विविध आकार आणि कॉन्फिगरेशन ऑफर करतात, सर्व प्रकारच्या तंत्रज्ञान आणि व्यावसायिक गरजा पूर्ण करतात. त्याचे स्थान, डिझाइन आणि त्याच्या अनोख्या जोडीमुळे, वाघोली हाय स्ट्रीट हे पुण्याच्या बाजारपेठेतील प्रवाश्यांना मार्केटिंगसाठी एक पसंतीचे ठिकाण बनले आहे.वाघोली हाय स्ट्रीट प्रकल्प सर्व प्रकारच्या व्यावसायिक मालमत्तेच्या गरजा पूर्ण करून दुकाने, सहकारी जागा आणि व्यावसायिक क्षेत्रे विविध आकार आणि कॉन्फिगरेशनमध्ये ऑफर करतो. स्थान, डिझाईन आणि सुविधांच्या अद्वितीय मिश्रणासह, वाघोली हाय स्ट्रीट हे पुण्यातील प्रीमियम व्यावसायिक मालमत्तांसाठी जाण्याचे ठिकाण बनणार आहे.

## पान एक वरून

**ऐनवेळी परवानगी**

बीडमध्ये आंबेडकरी जनतेकडून बीड रेल्वे स्टेशन नामकरण बाबतीत मोर्चाचे नियोजन करण्यात आले होते. त्यासाठी प्रशासनाला रीतसर निवेदन देऊन परवानगी देण्यात यावी अशी मागणी केली होती.परंतु पोलिसांनी पोलिसांनी काही अटी शर्तीवर होकार दिला.त्यानंतर काही वेळाने तो देखील नाकारला, त्यामुळे मोर्चाला येणाऱ्या लोकांपर्यंत हा निरोप जाणे शक्य नव्हते तशी बाब पोलिसांना दिलेल्या निवेदनात नमूद केली होती. ऐनवेळी परवानगी नाकारत असाल तर मोर्चाला येणाऱ्या लोकांपर्यंत हा निरोप पोहोचणार नाही. त्यामुळे आंबेडकरी समूह बीडमध्ये दाखल झाल्याशिवाय राहणार नाही. त्या ठिकाणी काही प्रकार घडला तर त्याला एकमेव पोलीस जबाबदार राहतील अशी निवेदन देण्यात आले होते. असे असताना पोलिसांनी सर्व बाबी अंधारात ठेवून आंबेडकरी जनतेला वेठीस धरण्याचे काम केले. एवढेच नव्हे तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर रेल्वे स्टेशन नामकरण संदर्भात जे जे कार्यकर्ते लीड करत आहेत त्यांना बुधवारी सकाळपासूनच धरपकड करण्यास सुरुवात केली. त्यामुळे आंबेडकरी जनतेच्या भावना आणखीन दुखावल्या गेल्या, बीड शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ सकाळी अकरा वाजल्यापासून दुपारी तीन पर्यंत आंबेडकरी समूह ठाण मांडून बसला होता. पोलीस प्रशासन आणि आंदोलनकर्ते यांच्यामध्ये थोडी शाब्दिक बोला बोली झाली. परंतु मोर्चेकऱ्यांनी पोलिसांना ठणकावून सांगितले आम्ही शांततेच्या मार्गाने आंदोलन करणारी माणसे आहोत. पोलीस प्रशासनाने आमच्या मोर्चाला गालबोट लावण्याचे काम करू नये. लोकशाहीमध्ये प्रत्येकाला त्याच्या अधिकारासाठी मोर्चे आंदोलने करण्याचा हक्क आहे. हा हक्क कोणालाही हिसकावून घेता येणार नाही. मोर्चेकरी असेही म्हणाले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाला बीडच्या नेत्याचा छुपा विरोध आहे. पोलीस प्रशासनाच्या अडून आंबेडकरी जनतेवर दबाव टाकला जातो आहे. मात्र या दबावाला आम्ही भीक घालत नाहीत. आंबेडकरी जनतेचे आंदोलन संपवून टाकण्यासाठी जाणीवपूर्वक राज्यपाल यांचा बीड जिल्हा दौरा आयोजित केला गेला आहे. परंतु आम्ही बाबासाहेबांचे नाव बीड रेल्वे स्टेशनला देण्यासाठी शेवटपर्यंत लढत राहणार आहोत. ज्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तमाम मानव जातीचा उद्धार केला त्यांच्या नावाला असा छुपा विरोध योग्य नाही. सर्व धर्मियांचा होकार असताना त्या एकट्या नेत्यामुळे सामाजिक वातावरण दूषित होत आहे. असा आरोप आंबेडकरी जनतेने केला.

**उद्योजक रतन टाटांनी घेतला**

श्रद्धांजली वाहिली आहे. जगभरात आपल्या गौरवास्पद कामगिरीतून देशाचा लौकीक वाढवणारे टाटा समूहाचे अध्यक्ष उद्योगपती रतन टाटा यांनी जगाचा निरोप घेतला. देशावर ओढवणाऱ्या नैसर्गिक अथवा मानवी अशा प्रत्येक संकटावर मात करण्यासाठी सदैव मदतीचा हात देणे हा रतन टाटा यांचा स्वभाव सदैव स्मरणात राहील. सामाजिक जाणीवेतून आपल्या यशाचा राजमार्ग घडवणारे व्यक्तिमत्त्व रतन टाटा यांना भावपूर्ण श्रद्धांजली! असे ते म्हणाले.याशिवाय रतन टाटांच्या निधनाचं वृत्त प्रसिद्ध होताच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शोक व्यक्त केला आहे. रतन टाटा एक दूरदर्शी व्यापारी नेतृत्त्व, एक दयाळू व्यक्तीमत्त्व आणि एक विलक्षण माणूस होते. त्यांनी भारतातील सर्वात जुन्या आणि प्रतिष्ठित व्यावसायिक घराण्यांना स्थिर नेतृत्व दिले. त्यांचे योगदान बोर्डरूमच्या पलीकडे गेले. नम्रता, दयाळूपणा आणि आपल्या समाजाला अधिक चांगले बनविण्याच्या अतूट बांधिलकीमुळे ते लोकप्रिय ठरले. रतन टाटा यांच्या सर्वात अनोख्या पैलूंपैकी एक म्हणजे मोठी स्वप्ने पाहण्याची आवड. शिक्षण, आरोग्यसेवा, स्वच्छता, प्राणी कल्याण यासारख्या अनेक कारणांमध्ये ते आघाडीवर होते. रतन टाटा यांच्याशी झालेल्या असंख्य संवादांनी माझे मन भरून आले आहे. मी मुख्यमंत्री असताना त्यांना गुजरातमध्ये वारंवार भेटत असे. आम्ही विविध मुद्द्यांवर विचार विनिमय करत असू. मला त्यांचा दृष्टीकोन खूप समृद्ध वाटला. मी दिल्लीत आलो तेव्हाही हे संवाद सुरूच होते. त्यांच्या निधनाने अत्यंत दुःख झाले आहे, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.२८ डिसेंबर १९३७ रोजी मुंबईत जन्मलेले रतन टाटा उद्योगांसह सामाजिक क्षेत्रातही काम करत आहेत. रतन टाटा हे टाटा समुहाचे संस्थापक जमशेटजी टाटा यांचे पणतू आहेत. १९९० ते २०१२ पर्यंत २२ वर्षे ते टाटा समुहाचे अध्यक्ष होते. तसेच ऑक्टोबर २०१६ ते फेब्रुवारी २०१७ दरम्यान, त्यांनी टाटा समुहाचे अंतरिम अध्यक्ष म्हणून कारभार पाहिला आहे. रतन टाटा यांनी अनेक वर्षे टाटा समुहाच्या चॅरिटेबल ट्रस्टचे प्रमुख म्हणून कामकाज पाहिलं आहे.एक यशस्वी उद्योगपती असण्याबरोबरच ते त्यांच्या परोपकार अन् दानधर्मासाठीही ओळखले जातात. रतन टाटा यांचा जन्म १९३७ मध्ये मुंबईत नवल टाटा आणि सुनी टाटा यांच्या पोटी झाला. रतन टाटा १० वर्षांचे असताना त्यांचे पालक विभक्त झाले, त्यानंतर त्यांचे संगोपन त्यांच्या आजी नवाजबाई टाटा यांनी केले. रतन टाटा यांनी त्यांचे सुरुवातीचे शिक्षण मुंबईतून घेतले. यानंतर त्यांनी बिशप कॉटन स्कूल, शिमला आणि रिव्हरडेल कंट्री स्कूल, न्यूयॉर्कमधून १९५५ मध्ये डिप्लोमा केला. रतन टाटा यांच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल सांगायचे झाल्यास त्यांनी कधीही लग्न केले नाही.केवळ उद्योगच नव्हे तर रतन टाटा हे त्यांच्या परोपकारी कार्यासाठीही जगभर प्रसिद्ध आहेत. रतन टाटा यांनी भारतीय विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी कॉर्नेल विद्यापीठाला एकूण २८ दशलक्ष डॉलर्स दान केले. यामुळे गरीब आणि मध्यमवर्गीय भारतीय विद्यार्थ्यांना मदत होते. याबरोबरच हार्वर्ड बिझनेस स्कूलने विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी ५० दशलक्ष डॉलर्स दान केले होते. याशिवाय त्यांनी २०१४ मध्ये खखढ बॉम्बेमध्ये संशोधनाला चालना देण्यासाठी ९५ कोटी रुपयांची देणगी दिली होती. याबरोबरच दरवर्षी ते आपल्या कमाईतील मोठा हिस्सा धर्मादाय कार्यात खर्च करतात.

**सोलर हायमास्टने बीड**

येणार आहेत. तसेच, शहरातील अनेक जुन्या पोलवरील पथदिवे बंद आहे. त्याठिकाणी देखील एलईडी पथदिवे बसविले जाणार आहेत. या कामाला प्रत्यक्षात सुरुवात झाली असून दिवाळीच्या आधीच बीड शहर उजळणार असल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

**बीड मतदारसंघात कोट्यवधींची कामे :** बीड विधानसभा मतदारसंघात कोट्यवधींची विकासकामे प्रत्यक्षात सुरू आहेत. अनेक कामे पूर्णत्वास गेली असून काही कामे प्रगतीपथावर आहेत. रस्ते, नाल्या, पथदिव्यांसह विजेची कामे, सभागृह, अंगणवाडी, दवाखान्यांसह विविध दुरुस्तीच्या कामांचा देखील यामध्ये समावेश आहे. या कोट्यवधींच्या विकासकामांसाठी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी उपमुख्यमंत्री ना.अजित पवार, पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करून निधी उपलब्ध करून दिला आहे.

**बीडमध्ये राज्यपालांनी**

पाणी प्रश्न यासारखे विषय मांडले.बीड जिल्हयातून मोठया प्रमाणात ऊसतोड मजूरांचे कामासाठी काही कालावधीसाठी स्थलांतर होते, त्यामुळे जिल्हयातच रोजगाराच्या संधी निर्माण कराव्यात, केंद्र सरकारतर्फे मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देऊन भाषेचा गौरव करण्यात आला आहे. या मराठी भाषेतील प्रथम आद्य कवी हे बीड जिल्ह्यातील आहेत या पार्श्वभूमीवर अंबाजोगाई येथे मराठी भाषेचे विद्यापीठ व्हावे, बीड शहरातील पाणीपुरवठा योजनेचा प्रश्न सोडविण्यासोबतच कापूस उद्योगाला सहकार्य करावे. कापूस, सोयाबीनसह शेतीमालाला चांगला दर मिळावा, घरकुल योजना, शेतीसाठी वीज यासह विविध विषयावर चर्चागटात सहभागी मान्यवरांनी आपली मते मांडली. राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी विविध घटकातील मान्यवरांचे म्हणणे ऐकून घेत सर्व मागण्या व विकास संकल्पनांबाबत लक्ष घालण्याबाबत आश्वस्त केले.जिल्हाधिका-यांनी जिल्ह्यातील विविध योजनांचे सादरीकरण केले. या बैठकीला प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यावेळी बैठकीत जिल्हयाचा ऐतिहासिक-सांस्कृतिक, भौगोलिक स्थिती व उद्योग तसेच जिल्हयात सुरू असलेल्या विविध कामाबाबत माहिती दिली.

**२५ कोटीच्या रस्ता कांमाचे**

ते कांबी, सौदाना रस्ता,९.७५० क.मी.किंमत ७ कोटी २७ लक्ष गेवराई तालुक्यातील भेड खु.ते.भेड बु.रस्ता ४ की.मी. किंमत ३ कोटी,केकत पागंरी ते हारीलाल नाईक तांडा, ३ कि.मी.२ कोटी रुपयाचे आज दि.१० ऑक्टोबर रोजी युवानेते शिवराज पवार यांच्या हास्ते शुभारंभ होणार आहे तरी सर्व ग्रामस्थांनी उपस्थित रहावुन विकासाचे साक्षीदार व्हावे एक आठवड्यात तब्बल शेकडो कोटीचा निधी आ.लक्ष्मण पवार यांच्या प्रयत्नातून मिळाला आहे

**रॅली काढून जल्लोषात**

मुंडे यांच्या विचाराने प्रेरित होवून डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांसमवेत पक्षात प्रवेश केला. यावेळी त्यांचा सत्कार करून डॉक्टर दाम्पत्याने स्वागत केले. यावेळी सरपंच ड.राजेंद्र राऊत, राष्ट्रवादी काँग्रेस ग्रंथपाल जिल्हाध्यक्ष भागवत आमटे, हनुमंत बोरगे, गोविंद खुरणे, पं.स.चे माजी सभापती सखाराम ठोकळ, सरपंच रामेश्वर आनेराव, हरिभाऊ आमटे, नवनाथ सपकाळ, माणिकभाऊ आमटे, मधुकर वाघमारे, राहुल साळुंके, ईश्वर धनवे, माजी सरपंच मसुराम साळुंके, नागापूर खु.चे सरपंच किशोर ढोकणे, मा.सरपंच तुकाराम जाधव, वसंत शिंदे, धर्मराज सोळूंके, अर्जुन अवघड, बाळू आमटे, मिलिंद ठोकळ, रमेश आमटे, धीरज कदम, जगदीश सपकाळ, अशोक वाघमारे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान सहा वरून

**साहित्यिकांनी दबाव**

करता अधिकारवाणीने बोलावे, असे आवाहन त्यांनी केले. प्रास्ताविकात प्रा. मिलिंद जोशी म्हणाले, वैचारिक मोकळेपणा, उदारमतवादी भूमिका घेणारी संस्था म्हणून महाराष्ट्र साहित्य परिषदेकडे बघितले जात आहे. ११९ वर्षांच्या कार्यकाळात मराठी भाषा जतन आणि संवर्धनासाठी परिषद कार्यरत असून लेखकांची खंबिरपणे पाठराखण करीत आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी परिषदेच्या माध्यमातून केलेल्या प्रयत्नांची माहितीही त्यांनी सांगितली. संजय नहार म्हणाले, परस्पर विरोधी विचारांच्या व्यक्ती साहित्य परिषदेत एकत्र येऊन समाजाची दिशा बदलण्याची क्षमता ठेवत कार्यरत असतात. विरोधकाला शत्रू मानायचे नसते अशी भूमिका घेणाऱ्या साहित्य परिषदेच्या वास्तूमध्ये राज ठाकरे यांच्या हस्ते बोधचिन्हाचे अनावरण होत आहे, ही आनंदाची बाब आहे. मराठी अस्मितेचा विषय ज्यावेळी येतो त्यावेळी राज ठाकरे हे कायम पुढे असतात. दिल्ली काबिज करायची आजही मराठी माणसात कुवत आहे, असे त्यांनी आवर्जून सांगितले.बोधचिन्ह साकारणारे प्रसाद गवळी यांचा तसेच संमेलनाच्या माजी अध्यक्षांचा यावेळी राज ठाकरे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. वात्रटिकाकार रामदास फुटाणे, संजय सोनवणी, राजन खान, शिरीष चिटणीस, राजन लाखे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. वंदना चव्हाण यांनी केले तर आभार लेषपाल जवळगे यांनी मानले.

**अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी**

सुरक्षा साठी वाहन नसले तरी चालेल मात्र आधी या जखमींना घेऊन हॉस्पिटलमध्ये जा, अशी सक्त ताकीदच त्यांनी वाहनचालकाला दिली. तसेच तातडीने घाटे रुग्णालयातील अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुकरे यांना फोन करून जखमींना योग्य ते उपचार करण्याच्या सूचनाही मुंडेंनी दिल्या.या दांपत्याला धडक देऊन निघून गेलेल्या गाडीचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत स्थानिक पोलिसांनाही धनंजय मुंडे यांनी सूचना दिल्या आहेत. धनंजय मुंडे हे एक संवेदनशील व्यक्तिमत्व असून अशा प्रसंगी तातडीने मदतीला जाण्याबाबत ते नेहमीच तत्पर असतात, त्याची प्रचिती आज पुन्हा एकदा आली.

**रिपाइं सर्व जाती धर्मीयांचा**

करताना म्हटले की गेल्या आठ दिवसापूर्वीच आरपीआय मुस्लिम आघाडीची स्थापना कोपरगाव शहरात केली तर गेल्या वर्षभरात १३ते १४ शाखेचे उद्घाटन करण्यात आले या वेळी तालुकाध्यक्ष अनिल रणनवरे यांचे भरभरून कौतुक केले . तसेच अन्याय करणाऱ्यापेक्षा अन्याय सहन करणारा मोठा गुन्हेगार असतो . आपण कुणावर अन्याय करायचा नाही आणि कोणी अन्याय करत असेल तर सहन करायचा नाही तर रिपाई हा सर्व जातीधर्माला सोबत घेऊन चालणारा पक्ष आहे तर आपला रिपाई परिवार सदैव अन्याय अत्याचाराच्या विरोधात तुमच्या पाठीशी खंबीर पणे उभा राहिल अशी जाहीरपणे आश्वासन दिले. यावेळी आयोजक म्हणून राजवाडा प्रतिष्ठान , तथागत तरूण मंडळ , पंचशील तरुण मंडळ ,लैब्यक ग्रुप तसेच हनुमान वाडी येथील संघर्ष तरुण मित्रमंडळ यांनी मोलाचे सहकार्य करुन मान्यवरांचे आभार मानले .तर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले वारी शाखा अध्यक्ष पदी आकाश जी निळे यांची निवड करण्यात आली तर शाखा उपाध्यक्ष पदी केतन जी भारूड यांची निवड करण्यात आली तसेच हनुमान वाडी शाखा अध्यक्ष पदी आनंद जी सुरडकर यांची निवड करण्यात आली तर शाखा उपाध्यक्ष पदी सागर जी साबळे यांची निवड करण्यात आली.

**बीडमध्ये उभा राहणार जिल्हा उद्योग**

हे सर्व सोयींनी युक्त तसेच संपूर्णपणे सौर उर्जेवर निर्भर असणार आहे, बांधकाम फर्निचर यासह विविध सुविधांसाठी एकूण १४ कोटी ६९ लाख २८ हजार रुपये इतका निधी खर्च करण्यास शासन निर्णयाद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून याबद्दल धनंजय मुंडे यांनी राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांचे आभार मानले आहेत.

**विद्यार्थिनींनो वेळेवर**

राष्ट्राचे भवितव्य आहात हे भवितव्य सक्षम असले पाहिजे. अन्याय सहन करु नका, अन्याला जाग्यावर ठेचले पाहिजे.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा डॉ विनोद जगतकर यांनी तर अध्यक्षीय समारोप प्रा प्रसाद देशमुख यांनी केला. सुत्रसंचालन व आभार प्रा पी.एम फुटके यांनी मानले. कार्यक्रमास विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. यावेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालयीन मैदानी स्पर्धा बीड येथील बलभीम महाविद्यालयात आयोजित करण्यात आल्या होत्या या स्पर्धेत ८०० मीटर रनिंग रेस मध्ये महाविद्यालयाची विद्यार्थिनी अश्विनी रावसाहेब राठोड हीचा तृतीय क्रमांक पटकावल्या बदल पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन व मार्गदर्शक क्रिडा संचालक प्रा डॉ प्रविण दिग्रसकर यांचा सत्कार करण्यात आला.

**नांदेड-पनवेल गाडीच्या बोगींची**

दररोज चालू कराव्यात क्रॉसिंगच्या निमित्ताने घाटनांदूर,वडगाव (निळा) इत्यादी स्टेशन वर विविध गाड्या विनाकारण अधिक वेळ खोळंबून ठेवू नयेत,परळी रेल्वे स्थानकातील आरक्षण वेळ वाढवावी यासह ईतर मागण्या करण्यात आल्या यावेळी नगरसेवक चेतन सौंदळे,प्रवासी महासंघ बीड जिल्हा संघटक सुधीर फुलारी सर,विजयाताई दहीवाळ,सत्यनारायण दुबे,माजी नगरसेवक सोमनाथ निलंगे,मकरंद नरवणे,कैलास तांदळे,राजेश कांकरिया, पत्रकार संजय खाकरे,रमणीक पटेल,चंदूअण्णा हालगे,शिरीष सलगरे,हिरालाल बोरा,अनिल मिसाळ,आदिंची उपस्थिती होती.परळी मार्गे विविध ठिकाणी रेल्वे सुरू करणे तसेच पिट लाईन यंत्रणा व रेल्वे स्थानकात अद्यावत सुविधा निर्माण करण्याचे काम रेल्वे विभागामार्फत करण्याचे सकारात्मक आश्वासन शिष्टमंडळास डीआरएम श्री.जैन यांनी दिले.

**पमहेबूबिया, अंजुमन एज्युकेशन**

रु. ब श्रेणीतील अंजुम उल लूम मुलींच्या प्राथमिक शाळेला प्रथम पारितोषिक देण्यात आले. अ गटात नात स्पर्धेत अंजुम शाळेची मदिहा फातेमा, तर जि.प.शाळा मधून सय्यद माहेरिन फातेमा आणि रुकिया रफिक शेख या दोघांना ब श्रेणीतील नात स्पर्धेत ३००० चे रोख पारितोषिक प्रत्येकी देण्यात आले. इमदादुल उलूम येथील सय्यद हमदान अतीक उर रहमान आणि अंजुम शाळेतील खांसा फातेमा हाफीज शेख या दोघांनाही अ गटातील भाषण स्पर्धेत ३००० चे प्रथम पारितोषिक देण्यात आले तर इमदादुल उलूम शाळेतील झैनाब तौहीद शेख हिला ब श्रेणीतील भाषण स्पर्धेत ३००० चे प्रथम पारितोषिक देण्यात आले. गौस जावेद शेख आणि सय्यद नूर जैनब हाजी या दोघांना ५ हजार रुपये चे प्रथम पारितोषिक देण्यात देण्यात आले. अ श्रेणीच्या लेखी परीक्षेचे प्रथम पारितोषिक ५००० रुपयांचे इमदादुल उलूम शाळेतील खान अल्फिया तय्यब आणि शेख बुशरा रशीद या दोघांना देण्यात आले. एकूण रोख पारितोषिक वितरण अंदाजे १५०००० होते. अनेक सहभागींना प्रोत्साहन पुरस्कार आणि रोख बक्षिसे देण्यात आली. या सीरत उन नबी सोहळ्यातील मान्यवर धार्मिक अभ्यासक, माध्यमातील व्यक्ती,आणि विद्यार्थी, पालक , माता यांनी मोठ्या संख्येने यावेळी उपस्थिती लावली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दोन्ही शाळांचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.सूत्रसंचालन सय्यद अन्वर सर यांनी केले तर अतिक उर रहमान सर यांनी आभार मानले.

**अध्यात्मिक सहवासाने मिळाले**

राजेभाऊ फड यांनी केले.त्यानंतर श्री क्षेत्र नारायणगड सह गहिनीनाथ गड येथेही ते मनोभावे नतमस्तक झाले. लोकसेवा माझ्या हातून घडावी यासाठी मी समाजकारण आणि राजकारणात आलो आहे. मी हाती घेतलेले जनसेवेचे व्रत अखंडपणे पुढे चालू राहावे यासाठी नवशक्ती मिळावी असे साकडे मी संतचरणी घातले असल्याचेही त्यांनी सांगितले. राजेभाऊ फड यांच्या आजच्या दौऱ्यात पक्षाचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते.

**आरोग्य कर्मचाऱ्यांना कारणे**

(दि.०७)बनोटी प्राथमिक आरोग्य केंद्रला कुलूपबंद करून आरोग्य कर्तव्यात कसूर केल्या प्रकरणी त्या आरोग्य कर्मचाऱ्यांवर जिल्हा आरोग्य विभागाने कारवाईसाठी तालुका आरोग्य अधिकारी डॉ गितेश चावंडा यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करून चौकशी करण्यात येणार आहे दरम्यान आरोग्य केंद्र बंद करून आरोग्य सेवा ठप्प केल्या प्रकरणी कारवाई करण्यात येणार आहे दरम्यान रविवारी आठवडे बाजारच्या दिवशी आरोग्य केंद्राचा बाहय रुग्ण विभाग सुरू ठेवून सोमवारी आरोग्य केंद्राचा आरोग्य सेवा ठप्प करण्याचा हा निर्णय स्थानिक कर्मचाऱ्यांनी घेतलेला आहे त्या नियमबाह्य निर्णया सोबत जिल्हा आरोग्य विभाग सहमत नाही सोमवारी आरोग्य केंद्र सुरू ठेवणं अनिवार्य आहे असेही स्पष्टीकरण जिल्हा आरोग्य विभागाने दिले आहे

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दूरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi news paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# वंचितचे पारडे होऊ लागले जड!

## पक्षांतर नतिकोद्दीन खतीबांसह अन्य मुस्लीम नेत्यांचा प्रवेश




मुंबई/पुण्यभुमी प्रतिनिधी काँग्रेसच्या सॉफ्ट–हिंदुत्वावर नाराज असलेले काँग्रेसचे ज्येष्ठ नेते खतीब सैय्यद नतीकोद्दीन यांचा इतर ९ मुस्लिम नेत्यांसह वंचित बहुजन आघाडी मध्ये सामील झाले आहेत. मुस्लिम प्रतिनिधीत्व मुद्द्यावर समझोता नाही करू शकत नाही असे खतीब यांनी वंचित बहुजन आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष रेखाताई ठाकूर यांच्या उपस्थितीत झालेल्या मुंबई येथे पत्रकार परिषदेत सांगितले.

लोकसभेच्या काळात मुस्लिमांना उमेदवारी देणे कठीण आहे. मात्र, येणाऱ्या विधानसभेत मुस्लिमांना आम्ही उमेदवारी देऊ असे काँग्रेसने म्हटले होते. विधान परिषदेत सुद्धा मुस्लिमांना न्याय मिळाला नाही. आमच्या मतांनी काँग्रेस आणि इंडिया आघाडी जिंकून येते आणि जेव्हा आम्हाला सत्तेत वाटा पाहिजे असतो तेव्हा मुस्लिमांचा बळी दिला जातो, असे खतीब यांनी म्हटले आहे.

खतीब म्हणाले की, मुस्लिमांना त्यांचे हक्क अधिकार मिळतील या हेतूने मी काँग्रेसमध्ये अनेक वर्षे काम केले. पण आम्ही २०२४ मध्ये जेव्हा लोकसभा निवडणुका झाल्या तेव्हा पाहिले की, काँग्रेसने एकाही मुस्लीम व्यक्तीला लोकसभेची उमेदवारी दिली नाही. लोकसभेच्या काळात संविधान वाचवण्याचा मुद्दा होता. तेव्हा देशातील सर्व अल्पसंख्याकांनी काँग्रेसला साथ दिली. एवढे होऊन सुद्धा काँग्रेस आम्हाला सहभागी करून घेत नाही. बाळासाहेब आंबेडकर हे अकोल्यातून दोनदा खासदार झाले आहेत. त्यांनी नेहमीच अकोल्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मुस्लिमांना प्रतिनिधित्व दिले. अकोल्यातील महिला व बालविकास सभापती मुस्लीम आहे. अनेक पदाधिकारी अल्पसंख्यांक समुदायातील आहेत. या वीस वर्षांत पंचायत समितीमध्ये सुद्धा बाळासाहेबांनी मुस्लीम सभापती बसवल्याची आठवण सुद्धा खतीब यांनी या वेळी करून दिली. खतीब कुटुंबीय मागील सात दशकांपासून काँग्रेसमध्ये आहे. मागील लोकसभेत काँग्रेसने मुस्लिमांना प्रतिनिधित्व नाकारल्याने आणि काँग्रेसच्या सॉफ्ट हिंदुत्वावर नाराजी व्यक्त करत त्यांनी वंचित बहुजन आघाडीमध्ये प्रवेश आहे केला आहे, असेही त्यांनी सांगितले.या वेळी वंचित बहुजन आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष रेखाताई ठाकूर, राज्य उपाध्यक्ष फारूक अहमद, इम्तियाज नदाफ आदी पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## सोयगाव परिसरात वादळी वाऱ्यासह पाऊस

### अस्मानी: शेतकऱ्यांच्या फळबागांचे नुकसान

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव सह परिसरात सायंकाळी पाच वाजता झालेल्या वादळी वाऱ्यासह जोरदार परतीच्या पावसाने तडाखा दिला असून वादळी वाऱ्याने वरखेडी(बु) शिवारात शेतकरी प्रितमसिंग सूर्यवंशी यांच्या शेतात गट क्र–१ मध्ये दहा हजार केळी आडवी झाल्याने त्यांचे तब्बल २५ लाख रुचे नुकसान झाले आहे दरम्यान सायंकाळी सात वाजेपर्यंत पाऊस सुरूच होता सावळदबारा मंडळात सलग दोन तास मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे विजांच्या कडकडाटात झालेल्या मुसळधार पावसाने सावळदबारा मंडळात कापूस भिजून नुकसान झाले आहे दरम्यान सोयगाव परिसरात कंकराळा,जरंडी, माळेगाव, पिंपरी, निंबायती,बहुलखेडा,



कवली,तिखी,उमर विहिरे, निमखेडी, घोसला आदी भागात अर्ध्या तास जोरदार पावसाने हजेरी लावली आहे.

दरम्यान शेतात वेचणी केलेला कापूस भिजून नुकसान झाले आहे वादळी वाऱ्याने वरखेडी बु शिवारात दहा हजार केळीचे झाडे घडा सह आडवे झाली आहे त्यामुळे शेतकरी प्रीतम सिंग सूर्यवंशी यांचे २५ लक्ष रुचे नुकसान झाले आहे दरम्यान सोयगाव परिसरात झालेल्या जोरदार पावसाने शेतकऱ्यांची तारांबळ उडाली होती सावळदबारा मंडळात दोन तास वादळी वारे सुरू होते त्यामुळे या भागाला नुकसानीची मोठा फटका बसला आहे या भागात चार वाजता सुरू झालेल्या मुसळधार परतीच्या पावसाने सायंकाळी साडेसहा वाजता उघडीप दिली होती

## उर्दू माध्यमातील शिक्षकांना पदोन्नती

### निर्णय:सीईओ आदित्य जीवने यांनी काढले आदेश

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये शिक्षकांच्या नियुक्ती बाबत मागणी होती त्याप्रमाणे उर्दू माध्यमातील १३ पदवीधर शिक्षकांना पदोन्नती देण्यात आली असून १९ शिक्षकांना नियुक्ती देण्यात आली आहे तसेच अंतर जिल्हा बदलीने आलेले ५७ सहशिक्षकांना पदस्थापना दिली असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांनी दिले आहे.



जिल्ह्यात प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभागामार्फत शिक्षकांच्या नियुक्ती बाबत नियोजन सुरू होते. काही शाळांमधून शिक्षक मिळण्याकरता मागणी देखील होत होती त्याप्रमाणे आज जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात समुपदेशन झाले. उर्दू माध्यमातील १३ शिक्षकांना पदोन्नती दिली असून १९ शिक्षकांची नियुक्ती वेगवेगळ्या शाळांवरती करण्यात आली आहे. या नियुक्तीमुळे उर्दू माध्यमातील अनेक शाळांचा शिक्षकांचा प्रश्न मार्गी लागला आहे. आंतरजिल्हा बदलीने आलेले शिक्षक शाळा मिळण्याच्या प्रतीक्षेमध्ये होते . सर्व शिक्षकांनी पदस्थापना व्हावी अशी विनंती शिक्षण विभागाला केली होती . त्याप्रमाणे आंतरजिल्हा बदलीने आलेल्या ५७ सहशिक्षकांना पदस्थापना देण्यात आली आहे.समुपदेशनाची प्रक्रिया गेल्या दहा वर्षापासून झाली नव्हती अनेक वेळा शिक्षकांनी याबाबत शिक्षण विभागाला विनंती केली होती . समुपदेशाने इच्छित ठिकाणी पदोन्नती व नियुक्ती तसेच पदस्थापना मिळाल्याने सर्व शिक्षक आनंदाने रुजू होण्यासाठी तयार झाले . शिक्षक संघटना व शिक्षण विभाग यांची प्रलंबित मागणी मात्र या समुपदेशाने पूर्ण झाली आहे.

## दिंद्रुड विद्यालयाचा जिल्हा क्रीडा स्पर्धेत डंका

### कौतुकास्पद : विद्यार्थ्यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड

दिंद्रुड/पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगांव तालुक्यातील दिंद्रुड विद्यालयाचे विद्यार्थी नुकत्याच झालेल्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत दिंद्रुड येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपले वर्चस्व सिद्ध केले. वेगवेगळ्या स्पर्धेत विद्यार्थी – विद्यार्थिनींनी मिळवलेले यश कौतुकास्पद असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेचा डंका जिल्हास्तरावर वाजवला. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे. अनेक विद्यार्थ्यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

बीड येथील जिल्हा क्रीडा स्टेडियमवर वेगवेगळ्या शालेय क्रीडा स्पर्धा पार पडल्या. यामध्ये १९ वर्ष वयोगटातील महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघा मार्फत घेण्यात येणार राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेसाठी चि.तंबुड ज्ञानेश्वर धर्मराज याची निवड झाली मध्ये




आहे. सैनिक विद्यालय बीड येथे मैदानी स्पर्धेत देशमाने समाधान गंगाराम यांची तिहेरी उडी मध्ये तर फपाळ सत्यम सोनप्पा ,फपाळ शिवम सोनप्पा बुध्दिबळ स्पर्धे साठी विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.

१७ वर्षे वयोगटातील चि.चौरे गणेश अनिल यांची गोळाफेक मध्ये तर १४ वर्षे वयोगटातील जलतरण स्पर्धेत कु. व्हरकटे अनुप्रिया रामकिसन हिची विभागीय स्पर्धे साठी निवड झाली. कु. तोंडे वैष्णवी सुदाम हिची २०० मीटर धावणे मध्ये द्वितीय येऊन विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. वेगवेगळ्या स्पर्धेतील या यशाबद्दल सर्व खेळाडूंचा विद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी प्राचार्य जी .व्ही उजगरे, पर्यवेक्षक पी .जी लखमावाड, सांस्कृतिक विभाग प्रमुख के. बी भोसले, क्रिडा विभागप्रमुख तथा पत्रकार कटारे डी. व्ही, श्रीमती खोले एस. बी., जेष्ठ शिक्षक वायबसे डी.बी. पालक व्हरकटे रामकिसन सर, तोंडे सुदाम व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

संस्थेचे अध्यक्ष शिवाजीभाऊ रांजवण व सचिव प्रतापभैय्या रांजवण यांनी खेळाडूंचे कौतुक केले असून विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## चक्क ग्रामसेवक हाकतोय कारभार!

### बोंबला: केज पंचायत समितीतला गोंधळ

केज /पुण्यभूमी प्रतिनिधी

केज पंचायत समितीचा कारभार चक्क ग्रामसेवक बघत आहे केज पंचायत समितीमध्ये प्रशासक असताना सभापती दालन उघडून चक्क त्या ग्रामसेवकाने सभापती दालणाचे आपले ऑफिसच बनवले आहे त्या ग्रामसेवकाचा मनमानी कारभार कोण थांबवणार याकडे संपूर्ण केस तालुक्याचे लक्ष लागले आहे पंचायत समिती मध्ये बीडीओचे सर्व अधिकार ग्रामसेवकाला दिल्यासारखे झाले आहे. कारण बिडीओ चे सर्व कामे एक ग्रामसेवक पहात असल्याने जोरदार चर्चा होत आहे जर पंचायत समितीचा कारभार एका ग्रामसेवकाकडे आहे तर मग केज पंचायत समितीचे बिडीओ काय काम पाहात आहेत ग्रामसेवकच बीडीओची लॉगीन आयडी वापरतो व त्यांच्या मनावर जनतेची कामे करतो तसेच एखाद्या कामासाठी पैसे दिले नाही तर त्याचे काम अडविले जाते त्या चे काम केले जात नाही असे अनेक प्रकार घडत आहेत. त्या ग्रामसेवकाचा एवढा रुबाब वाढला आहे की केज पंचायत समितीचा गटविकास अधिकारी पदाचा पदभार त्या ग्रामसेवकाकडे दिला तरी आता काही हरकत नाही तसेच तो ग्रामसेवक टक्केवारी घेऊन कामाची रक्कम जमा करतो जर टक्केवारी नाही दिली.तर त्या कामाची रक्कम सोडत नाही अशी माहिती मिळत आहे.त्या ग्रामसेवकाचा मनमानी कारभार बंद करण्यात यावा नाहीतर बिडीओ दिवाने मॅडम यांनी गटविकास अधिकारी पदाचा राजीनामा द्यावा अशी चर्चा होत आहे.केज पंचायत समितीचा कारभार झेपत नसेल तर तात्काळ राजीनामा द्यावा आणि चार्ज त्या ग्रामसेवकाला देण्यात यावा अशी चर्चा नागरिकांनमध्ये होत आहे केज पंचायत समितीचे बीडीओ तर याकडे लक्ष देत नाही सिईओ साहेब तुम्ही तरी लक्ष द्या.

## मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन

कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

येथील स्वामी समर्थ सेवा केंद्राच्या वतीने गुरुवारी एक दिवसीय मोफत आरोग्य तपासणी व नाडी परीक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

कडा येथील स्वामी समर्थ सेवा केंद्राच्या वतीने अखिल भारतीय स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर , मोरे दादा चॅरिटेबल हॉस्पिटल ट्रस्ट यांच्या सहकार्याने कडा येथील स्वामी समर्थ सेवा केंद्र , गजानन कॉलनी या ठिकाणी गुरुवार दिनांक १० ऑक्टोबर रोजी सकाळी दहा ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत मोफत आरोग्य तपासणी , मार्गदर्शन व नाडी परीक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात डॉ पाटील आणि डॉ गोरकर हे रुग्णांची तपासणी करणार आहेत . रुग्णाला आवश्यक गोळ्या , औषधे देखील तेथेच उपलब्ध असणार आहेत . जास्तीत जास्त रुग्णांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन स्वामी समर्थ सेवा केंद्राच्या वतीने करण्यात आले आहे.

## जुन्या मित्रांची भरणार पून्हा शाळा!

### विजयकुमार डोंगरे: माजी विद्यार्थांनी उपस्थित राहावे

तलवाडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक विजयकुमार डोंगरे यांच्या संकल्पनेतून माजी विद्यार्थी महामेळाव्याचे आयोजन दि.११/१०/२०२४ शुक्रवारी सकाळी ११:०० वा. आयोजन करण्यात आले आहे. तलवाड्यातच नव्हे तर बीड जिल्ह्यात प्रथमतःच असा माजी विद्यार्थी महामेळावा होत असल्याचे सर्वसामान्य नागरिकांतून बोलले जात आहे. न्यायाधीश, डॉक्टर, वकील, इंजिनियर, पोलीस, शिक्षक, केंद्राच्या पोस्ट ऑफिस मध्ये अधिकारी, महामंडळ परिवहन मध्ये अधिकारी, कर्मचारी , उद्योजक, सामाजिक, राजकीय या व असंख्य क्षेत्रात पदाधिकारी म्हणून आज माजी विद्यार्थी तलवाडा जिल्हा परिषद शाळेतील मोठमोठ्या पदावर विराजमान



झाले आहेत.

सर्व गांवातील प्रतिष्ठित मान्यवर माजी विध्यार्थी पालक, शिक्षणप्रेमी, सर्व गावकरी यांना सविनय विनंती करण्यात येते की जि.प.मा.शा. तलवाडा या शाळेमध्ये विविध भौतिक सुविधा करण्यासाठी. विद्यार्थ्यांसाठी फर्निचर, वॉटर फिल्टर, शौचालय दुरुस्ती इतर डिजिटल सुविधा प्रत्येक वर्गात ढ.त सर्व सुविधा करणे आहे. तसेच शाळेत विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी उउढत कैमेरे बसवणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

## नाथ्रामध्ये सुसज्ञ बुद्ध विहार बांधून द्या

### निवेदन: ऑल इंडिया पँथर सेनेची मागणी

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

तालुक्यातील मौजे नाथरा येथे सुसज्ञ बौद्ध विहार बांधून देण्याची मागणी ऑल इंडिया पँथर सेनेचे तालुकाध्यक्ष गौतम आदमाने यांनी राज्याचे सामाजिक न्याय मंत्री यांना एका निवेदनाद्वारे केली आहे.याबाबत दिलेल्या निवेदनात त पुढे म्हटले आहे की,मौजे नाथ्रा ता. परळी वै. जि. बीड येथील महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नियोजित स्मारकाची जागा ग्रामपंचायत नमुना नं ८ अ ला नोंद करूण पुतळ्या समोरील जिर्ण अवस्थेत असलेल्या सभागृहाच्या ठीकाणी सुसज्ञ बौध्द विहाराची निर्मिती करूण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारकासाठी निधी उपलब्ध करून द्यावा.



गावत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक बऱ्याच वर्षा पासून अस्तित्वात आहे चळवळीतील जुन्या लोकांनी ते उभा केले आहे. स्मारकाच्या बाजूला स्मारकासाठी सोडलेली रिकामी जागा आहे. स्मारका समोर बऱ्याच वर्षा पासून बांधलेले जुने जिर्ण आवस्थेत सभागृह आहे.

आडीच वर्षा पासून सरपंचानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा नविन पुतळा आणून ठेवला आहे .स्मारकाच्या बांधकामासाठी निधी नाही म्हणून आडीच वर्षा पासून सरपंच , ग्रामसेवक ग्राम पंचायत कार्यालयात डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा बंदिस्त ठेवलेला आहे.सदरिल गाव हे पालकमंत्री धनंजय मुंडे तसेच माजी मंत्री पंकजाताई मुंडे यांचे गाव असताना सुद्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी निधी मिळत नसल्याचे निवेदनात म्हटले आहे.

## धनंजय मुंडे ऐन सणासुदीच्या काळात गिफ्ट

# २८ हजार घरकुलांना शासनाची मंजुरी

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांनी बीड जिल्हा वासीयांना ऐन सणासुदीच्या काळात मोठे गिफ्ट दिले असून, इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेतून जिल्ह्यासाठी तब्बल २८ हजार घरकुले मंजूर करण्यात आली आहेत.

याबाबतचे शासन निर्णय आज निर्गमित करण्यात आले आहेत. यामध्ये एका शासन निर्णयाद्वारे १७०८१ तर दुसऱ्या शासन निर्णयाद्वारे ९९४१ अशा एकूण २८ हजार घरकुलांना मंजुरी देण्यात आली आहे. तर पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे मंत्री श्री अतुल सावे यांचे याबद्दल आभार मानले आहेत.





विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील गरजू नागरिकांना यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेतुन स्वतः चे पक्के घर बांधण्यासाठी १ लाख २० हजार रुपये निधी दिला जातो. बीड जिल्ह्यातील तालुकानिहाय प्राप्त प्रस्ताव मान्यतेसाठी पाठवण्याबाबत जिल्हास्तरीय समितीने निर्णय घेऊन प्राप्त प्रस्तावांची यादी राज्य शासनास सादर केली, त्यानुसार पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या पुढाकारातून तब्बल २८ हजार घरकुलांना एकाच वेळी मंजुरी देण्यात आली आहे.

बीड जिल्ह्यात तालुकानिहाय आकडेवारी पाहता, घरकुलांसाठी एकत्रित पणे इतक्या मोठ्या प्रमाणात घरकुल मंजूर करण्यात आले आहेत, धनंजय मुंडे यांच्या आग्रही भूमिकेमुळे हे होऊ शकले, असे बोलले जात आहे. जिल्ह्याच्या इतिहासात इतक्या मोठ्या संख्येने एका योजनेतून घरकुलांना मंजुरी मिळण्याची ही पहिलीच वेळ असून, यामध्ये सर्व तालुक्यांना न्याय देण्यात आला आहे.

## पहिले जात प्रमाणपत्र जाधव यांना प्राप्त !

### दिलासा: खा.बजरंग सोनवणे यांच्या हस्ते सुपूर्द



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील यांच्या आर्शिवाद मराठा कुणबी प्रमाणपत्राचे पहिले जात वैधता प्रमाणपत्र (कास्ट व्हॅलिडीटी) केज शहरातील केज नगरपंचायतचे नगर सेवक बालासाहेब जाधव यांना प्राप्त झाल्याबद्दल खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.या विषय सविस्तर वृत्त असे की मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील यांच्या आर्शिवादाने व मनोज जरांगे पाटील यांचे सुरु असलेल्या एक वर्षा पासूनच्या मराठा आरक्षणाच्या लढ्याला कुठे तरी यश मिळत मिळाले आहे व मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील यांच्या आर्शिवादाने मराठा कुणबी प्रमाणपत्राचे पहिले जात वैधता प्रमाणपत्र (कास्ट व्हॅलिडीटी) केज शहरातील केज नगरपंचायतचे नगर सेवक बालासाहेब जाधव यांना प्राप्त झाल्याबद्दल खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले यावेळी उपस्थित नगरसेवक बाळासाहेब जाधव, रोहन गलांडे पाटील,गुळभिले साहेब, दादा पाटील,व खासदार बजरंग बप्पा सोनवणे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते .



## हरियाणाच्या निकालानंतर मुख्यमंत्री सैनी यांचे विधान
## मतमोजणीच्या प्रत्येक फेरीनंतर भाजपची यशस्वी घोडदौड

# हा विजय केवळ पंतप्रधान मोदीमुळेच शक्य झाला

वृत्तसंस्था

**चंदीगडः** राजकीय अभ्यासक आणि निवडणूकपूर्व मतांचे कल या साऱ्याचा अंदाज चुकवत भाजपाने तिसऱ्यांदा हरियाणात विजय संपादन केला. सुरुवातीला जोरदार उसळी मारणाऱ्या काँग्रेसला अवघ्या दोनच तासात भाजपाने पिछाडीवर सोडले आणि मतमोजणीच्या प्रत्येक फेरीनंतर भाजपाने यशस्वी घोडदौड केल्याचे दिसले.

लोकसभा निवडणुकीनंतर ही पहिलीच विधानसभा निवडणूक असल्याने या निकालाकडे संपूर्ण देशाचे लक्ष होते. भाजपाचीही प्रतिष्ठा पणाला लागलेली होती, पण अखेर हरयाणात भाजपाने दमदार कामगिरी केली. या विजयाचे सगळे श्रेय पंतप्रधान मोदी यांनाच जाते, अशा भावना राज्याचे मुख्यमंत्री नायबसिंग सैनी यांनी व्यक्त केल्या.

### हरियाणाच्या लोकांनी पुन्हा भाजपावर विश्वास दाखवला

'मी लाडवा आणि हरयाणाच्या २ कोटी ८० लाख लोकांचे आभार व्यक्त करतो. हरियाणातील या विजयाचे श्रेय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाच जाते. हा विजय म्हणजे एका अर्थाने मोदीजींनी राबवलेल्या विविध योजनांवर शिक्कामोर्तबच आहे. मी राज्यपाल महोदयांकडून प्रमाणपत्र घेईन आणि त्यानंतर भगवान श्रीकृष्णाच्या ज्योतिसर मंदिरात जाऊन दर्शन घेईन. हरियाणाच्या लोकांनी पुन्हा एकदा भाजपावर विश्वास दाखवला आहे. आम्ही यापुढेही मोदीजींच्या नेतृत्वाखाली पुढील वाटचाल करू. तिसऱ्यांदा हरयाणाच्या जनतेने भाजपाची निवड केली आहे, असे हरयाणाचे मुख्यमंत्री नायब सिंग सैनी म्हणाले.

# सेबीच्या नव्या प्रमुखाचा शोध सुरू

देशोन्नती वृत्तसंकलन



**नवी दिल्ली :** सरकारने सेबीच्या नव्या प्रमुखाचा शोध घेण्याची प्रक्रिया सुरू केली असल्याची माहिती समोर आलीये. नवे प्रमुख सेबीच्या विद्यमान अध्यक्ष माधवी पुरी बुच यांची जागा घेतील.

सूत्रांनी यासंदर्भातील माहिती दिली आहे. सात ते दहा दिवसांपूर्वी ही प्रक्रिया सुरू झाली असल्याचेही सूत्रांनी सांगितले.


सूत्रांनी नाव न छापण्याच्या अटीवर ही माहिती दिली. मनीकंट्रोलने यासंदर्भातील वृत्त दिलेय. माधबी पुरी बुच या २ मार्च २०२२ रोजी सेबीच्या प्रमुख झाल्या. सेबी प्रमुखांचा कार्यकाळ तीन वर्षांचा असतो. त्यांचा यांचा कार्यकाळ २८ फेब्रुवारी २०२५ रोजी संपत आहे. अध्यक्षपदी नियुक्ती होण्यापूर्वी बुच एप्रिल २०१७ ते मार्च २०२२ अशी पाच वर्षे सेबीच्या पूर्णवेळ सदस्या होत्या.

लवकरच अर्ज मागवण्याची शक्यता

सध्याची परिस्थिती पाहता बुच यांचा कार्यकाळ वाढवण्याच्या पर्यायावर सरकार विचार करते की नाही, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. सेबीच्या प्रमुखपदासाठी उमेदवारांकडून अर्ज मागविण्याची औपचारिक प्रक्रिया काही आठवड्यांत सुरू होण्याची शक्यता आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली. बुच यांचा उत्तराधिकारी शोधण्याची प्रक्रिया सुरू झाली असली तरी विद्यमान अध्यक्षांना मुदतवाढ मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही, असेही या प्रकरणाशी संबंधित काही सूत्रांनी सांगितले.

# मुलाने डोक्यात सिमेंटचा ब्लॉक मारून केला वडिलांचा खून

देशोन्नती वृत्तसंकलन



**दौंड/ पुणे :** कौटुंबिक वादातून जीव घेण्यापर्यंतच्या घटना घडू लागल्या आहेत. पती पत्नीच्या वादातही खून झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. पण आता दौंड तालुक्यात मुलाचे वडिलांसोबत वैर निर्माण झाल्याचे समोर आले आहे.

मुलाने किरकोळ वादावरून बापाचा डोक्यात सिमेंटचा ब्लॉक टाकून खून केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. यासंदर्भात मुलाच्या आईने पोलिसांना फिर्याद दिली आहे. सुनील रणदिवे यांचा या घटनेत दुर्दैवी मृत्यू झाला आहे. याप्रकरणी सचिन रणदिवे याच्यावर खुनाचा गुन्हा दाखल करून त्याला अटक केली असल्याची माहिती पोलिस निरीक्षक गोपाळ पवार यांनी दिली.

सुनील रणदिवे आणि जयश्री रणदिवे हे पती पत्नी आहेत. त्यांचा मुलगा सचिन सोबत वाद सुरु होता. त्यावेळी सचिनला दोघांनी वाद घालू नको म्हणून समजावून सांगितले.

# अतिआत्मविश्वास बाळगणे धोक्याचे

वृत्तसंस्था

**नवी दिल्लीः** निवडणुकांना गृहीत धरू नका. आजच्या निवडणुकीतील सर्वात मोठा धडा हा आहे की, कधीही अतिआत्मविश्वास ठेवू नये. प्रत्येक निवडणूक ही खडतर असते, याची जाणीव ठेवा. कोणत्याही प्रकारची अंतर्गत लढाई होता कामा नये, असा सल्ला आपचे नेते अरविंद केजरीवाल यांनी कार्यकर्त्यांना दिला आहे.

जम्मू-काश्मीर आणि हरियाणा विधानसभा निवडणुकीचे निकाल आता स्पष्ट होत आहेत. जम्मू-काश्मीरमध्ये नॅशनल कॉन्फरन्स आणि काँग्रेसच्या आघाडीचा सत्ता स्थापनेचा मार्ग मोकळा झाला आहे. तर हरियाणात भाजपने पुन्हा एकदा मुसंडी मारत सलग तिसऱ्यांदा सरकार स्थापनेकडे वाटचाल केली आहे. या दोन्ही राज्यांच्या निकालाची आम आदमी पक्षाचे निमंत्रक व दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी धास्ती घेतली आहे. त्यांनी आपल्याच पक्षाच्या नेत्यांसह कार्यकर्त्यांना या निकालानंतर एक सल्ला दिला आहे.

**निकालातून केजरीवालांनी शिकला 'धडा'**



दोन्ही राज्यांत आपने उभे केले होते ६० उमेदवार

हरियाणात 'आप'ने ६० जागांवर निवडणूक लढवली होती. तर जम्मू-काश्मीरमध्ये 'आप'ने ८-९ जागांवर निवडणूक लढवली होती. केवळ जम्मू-काश्मीरमधील डोडा मतदारसंघात आम आदमी पक्षाचे उमेदवार मेहराज मलिक यांनी भाजपचा पराभव करत दणदणीत विजय मिळवला आहे.

कधीही अतिआत्मविश्वास बाळगू नका, अंतर्गत लढाई करू नका

जम्मू-काश्मीर आणि हरियाणा विधानसभा निवडणूक निकालानंतर केजरीवालांनी आपला पक्षाला एक सल्ला दिला आहे. त्यांनी म्हटले आहे की, 'निवडणुका जवळ येत आहेत. कोणत्याही निवडणुकांना गृहीत धरू नका. आजच्या निवडणुकीतील सर्वात मोठा धडा हा आहे की, कधीही अतिआत्मविश्वास ठेवू नये. प्रत्येक निवडणूक ही खडतर असते, याची जाणीव ठेवा.

# वाढदिवसाचा केक खाल्ल्याने ५ वर्षाच्या मुलाचा मृत्यू

## आई-वडिलांवर आयसीयूमध्ये उपचार सुरू

देशोन्नती वृत्तसंकलन



**बंगळुरूः** बंगळुरूमधील भुवनेश्वरी नगर भागातील केपी अग्रहारा येथे वाढदिवसाचा केक खाल्ल्याने ५ वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाला. तर, त्याच्या आई-वडिलांवर आयसीयूमध्ये उपचार सुरू असून त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती समोर आली. या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ माजली.

बलराज आणि नागलक्ष्मी असे या आयसीयूमध्ये उपचार सुरू असलेल्या दाम्पत्याचे नाव आहे. बलराज हा स्विगी कंपनीत डिलिव्हरी बॉय म्हणून काम करतो. रविवारी, ६ ऑक्टोबर रोजी एका ग्राहकाने केकची ऑर्डर रद्द केली होती, त्यानंतर तो केक त्याच्या घरी घेऊन आला.

तर, मात्र, काही मीडिया रिपोर्ट्समध्ये असे म्हटले जात आहे की, बलराजने त्याचा मुलगा धीरजच्या वाढदिवसानिमित्त स्विगीवरून केक ऑर्डर केला होता. वाढदिवस साजरा केल्यानंतर बलराज, नागलक्ष्मी आणि धीरज रविवारी रात्री झोपायला गेले. मात्र, सोमवारी सकाळी उठल्यानंतर तिघांच्याही पोटात दुखू लागल्याने त्यांना शेजाऱ्यांनी जवळच्या रुग्णालयात दाखल केली. मात्र, तिथे पोहोचल्यानंतर डॉक्टरांनी धीरजला मृत घोषित केले.

# सायबर अधिकारी असल्याचे सांगत तरुणीला 27 लाखांचा गंडा

देशोन्नती वृत्तसंकलन



**मुंबई :** सायबर अधिकारी असल्याचे सांगत एका २७ वर्षीय तरुणीला लाख रुपयांचा गंडा घातला. तसेच व्हिडीओ कॉलवर निर्वस्त्र होण्याची मागणी केली. ही धक्कादायक घटना सांताक्रूझमध्ये घडली. याविरोधात तरुणीने वाकोला पोलिसात तक्रार दाखल केली असून, दोघांवर माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६ (सी), ६६(ड) तसेच बीएनएस कायद्याचे कलम ३१८(४), ३१९(२) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

६ ऑक्टोबर रोजी तक्रारदार तरुणी घरी असताना सकाळी अनोळखी मोबाइलवरून फोन आला. समोरच्या कॉलरने तो डीएचएल लॉजिस्टिक दिल्ली ब्रँचमधून अविरॉय शुक्ला बोलत आहे, असे सांगितले. तुमचे पार्सल आहे. ज्यामध्ये तीन क्रेडिट कार्ड, चार किलो कपडे, एक लॅपटॉप, ड्रग्ज सापडले आहेत. या बेकायदेशीर बाबीसह तुमचे आधार आणि मोबाइल क्रमांक याच्याशी लिंक आहे. यासाठी तुम्हाला दिल्ली सायबर सेलमध्ये जावे लागेल, असे सांगितले.

दरम्यान, त्याने अन्य एका व्यक्तीला कॉल कनेक्ट केला जो स्वतःला दिल्ली सायबर क्राइमचा अधिकारी असल्याचे भासवत होता. त्याने तरुणीला स्काइप ॲप डाऊनलोड करण्यास भाग पाडले आणि तुमच्यावर सुप्रीम कोर्टमध्ये ह्यूमन ट्राफिकिंग व मनी लॉन्ड्रिंगचा आरोप आहे. तुमचे बँक अकाउंट स्टेटमेंट पाठवा, असे सांगितले.

अटक होईल, पैसे परत मिळणार नाहीत

घाबरलेल्या तरुणीने स्वतःच्या खात्यातील १ लाख रुपये भामट्यांच्या अकाउंटवर पाठवले. या बदल्यात त्यांना क्लीअरन्स सर्टिफिकेट पाठवत अजून पैशांची मागणी केली.

# हरियाणा निवडणूक निकालात विलंब

## काँग्रसचे आरोप निवडणूक आयोगाने फेटाळले

देशोन्नती वृत्तसंकलन

**नवी दिल्लीः** हरियाणा विधानसभा निवडणूक निकालाच्या विलंबावरून काँग्रसने केलेले आरोप केंद्रीय निवडणूक आयोगाने फेटाळून लावले. हरियाणा निवडणूक निकालाची आकडेवारी संकेतस्थळावर अद्ययावत करण्यास आयोगाने विलंब केल्याचा आरोप काँग्रसने मंगळवारी सकाळी केला. त्यावर निवडणूक आयोगाने उत्तर देताना, हे आरोप बेजबाबदार आणि निराधार असल्याचे म्हटले.

मंगळवारी, हरियाणा विधानसभा निवडणुकीची मतमोजणी सुरू असताना काँग्रेसचे माध्यम सरचिटणीस जयराम रमेश यांनी निवडणूक आयोगाला पत्र लिहून निवडणूक आयोग संकेतस्थळावर आकडेवारी अद्ययावत करण्यास विलंब करत आहे, असा आरोप केला. निवडणुकीची मतमोजणी निवडणूक आचार नियमांच्या नियम ६० नुसार केली जात असल्याचे आयोगाने सांगितले.




आरोपाबाबत कोणतेही पुरावे नाहीत

हरियाणा आणि जम्मू-काश्मीरमधील संपूर्ण मतमोजणी प्रक्रिया उमेदवार, निरीक्षक आणि सूक्ष्म निरीक्षकांच्या उपस्थितीत सुरू आहे, असे निडवणूक आयोगाने सांगितले. जयराम रमेश यांनी आरोप करताना कोणत्याही विशिष्ट मतदारसंघात विलंब झाल्याचे स्पष्ट करण्यासाठी कोणतेही तथ्यात्मक पुरावे दिलेले नाहीत, असे आयोगाने म्हटले आहे.

# अल्पवयीन मुलीवर सामूहिक अत्याचार, ३ अटकेत

देशोन्नती वृत्तसंकलन

**वडोदराः** गुजरातमधील वडोदरा शहरातील भैली भागात शुक्रवारी रात्री अल्पवयीन मुलीवर झालेल्या सामूहिक अत्याचार प्रकरणी पोलिसांनी मुख्य तीन आरोपींसह ५ जणांना अटक केली आहे. आरोपींना पकडण्यासाठी वडोदरा गुन्हे शाखेने १००० हून अधिक सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या ७० हजारांहून अधिक फुटेजचे विश्लेषण केले. यानंतर घटनास्थळी सापडलेला चष्मा आणि फोन कॉलवरून आरोपीचा शोध घेण्यात आला.

तिन्ही आरोपी मूळचे उत्तर प्रदेशचे असून ते वडोदरा येथील तांदलजा भागात काही वर्षांपासून राहत होते.

**१००० सीसीटीव्हीचे ७० हजारांहून अधिक फुटेज स्कॅन**

मुन्ना अब्बास बंजारा (२७), मुमताज उर्फ आफताब सुभेदार बंजारा (३६) आणि शाहरुख किस्मत अली बंजारा (२६) अशी आरोपींची नावे आहेत. वडोदरा एसपी रोहन आनंद यांनी दिलेल्या माहितीनुसार, सामूहिक बलात्काराच्या घटनेनंतर आरोपींनी पीडितेचा मोबाईल फोनही सोबत नेला होता. मोबाईलचे लोकेशन अकोटा परिसरातील होते. यानंतर आरोपीने फोन बंद करून फेकून दिला.

# अमेरिकेत शतकातील सर्वात धोकादायक वादळाची भीती

वृत्तसंस्था

**वॉशिंग्टनः** १० दिवसांत दुसऱ्यांदा मोठे वादळ अमेरिकेत धडकणार आहे. वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, मिल्टन चक्रीवादळाच्या संदर्भात फ्लोरिडामध्ये इशारा देण्यात आला आहे. राष्ट्रीय चक्रीवादळ केंद्राने याला सर्वात विनाशकारी वादळांच्या श्रेणी ५ मध्ये ठेवले आहे. या प्रकारात मोठ्या प्रमाणात जीवित व मालमत्तेची हानी होण्याचा धोका आहे.

## ५ लाख लोकांचे स्थलांतर

मिल्टन बुधवारी फ्लोरिडाच्या दाट लोकवस्तीच्या 'टाम्पा बे'ला धडकू शकतो. आता ते टाम्पापासून १००० किमी अंतरावर आहे. टाम्पाची लोकसंख्या ३ दशलक्षाहून अधिक आहे. हे वादळ टाम्पा खाडीत पोहोचल्याने ते कमकुवत होण्याची अपेक्षा आहे. यानंतर ते मध्य फ्लोरिडाहून अटलांटिक महासागराच्या दिशेने जाईल.

मिल्टन चक्रीवादळ सध्या मेक्सिकोच्या खाडीतून जात आहे. सोमवारी रात्री वादळाचा वेग ताशी २८५ किमी इतका होता. ते फ्लोरिडा राज्याकडे निघाले आहे. वादळामुळे फ्लोरिडाच्या ६७ पैकी ५१ काऊंटीमध्ये आपत्कालीन अलर्ट जारी करण्यात आला आहे. फ्लोरिडातील किनारी भाग रिकामा करण्यात येत आहे.

# भरधाव कार चालवताना मोबाईल पाहणे पडले महागात

## यूट्यूबरच्या कोट्यवधी रुपयांच्या कारचा चक्काचूर

वृत्तसंस्था



**फ्लोरिडाः** सध्याच्या सोशल मीडियाच्या युगात आजची तरुणाई प्रसिद्धीसाठी काहीही करायला तयार असते. पुण्यात एक मुलगी इमारतीला लटकली होती तर एकीने दुचाकीवर स्टंट केले होते. मात्र, अमेरिकेतील एका २० वर्षीय यूट्यूबर कळस गाठला आहे. कार चालवतांना मोबाइल पाहणे धोकादायक असतानादेखील लाईव्ह स्ट्रिमिंग सुरू असताना मोबाइल पाहणे या यूट्यूबर महागात पडले आहे. या नादात त्याचा भीषण अपघात झाला असून तो आणि त्याचा मित्र थोडक्यात वाचले आहेत.

या अपघातात त्यांच्या १ कोटी ७० लाख रुपयांच्या सुपर कारचा मात्र, चुराडा झाला.

# इस्रो मधील शास्त्रज्ञाची नोकरी सोडली, सुरू केला स्टार्टअप

## आता वर्षाला होतेय २ कोटींची कमाई

देशोन्नती वृत्तसंकलन

**कन्याकुमारी /तामिळनाडू :** प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर अनेक अशक्य वाटणाऱ्या गोष्टी या शक्य करता येतात. अशीच एक प्रेरणादायी घटना समोर आली आहे. इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन (इस्रो) चे शास्त्रज्ञ उथैया कुमार यांनी ७ वर्षांनंतर नोकरी सोडली आणि कॅब सर्व्हिस स्टार्ट-अप सुरू केले. या व्यवसायातून आता वर्षाला २ कोटींची कमाई होत आहे. त्यांच्या या प्रेरणादायी प्रवासाचे सोशल मीडियावर भरभरून कौतुक होत आहे.

उथैया कुमार हे कन्याकुमारी जिल्ह्यातील एका छोट्या गावातून आले आहेत. इस्रोमध्ये रुजू होण्यापूर्वी त्यांनी एमफिल डिग्री घेतली आणि पीएचडीही पूर्ण केली. इस्रोमधून नोकरी सोडल्यानंतर उथैया कुमार यांनी इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये असिस्टंट प्रोफेसर म्हणूनही काम केले. २०१७ मध्ये उथैया कुमार यांची दुसरी इनिंग सुरू झाली, जेव्हा काही मित्रांनी उथैया यांना एसटी कॅब सुरू करण्यासाठी पैसे उभारण्यास मदत केली.



**भोपाळ :** मध्यप्रदेशमध्ये जंगल सफारीचा आनंद घेणाऱ्या पर्यटकांचा आनंद द्विगुणीत झाला आहे. मान्सूननंतर पर्यटकांसाठी खुल्या झालेल्या पन्ना व्याघ्र प्रकल्पातून आनंदाची बातमी आहे. वाघिण पी-१४१ ने चार शावकांना जन्म दिला आहे.

# भाजपला चूक महागात पडली, सर्वात श्रीमंत महिलेला तिकिट नाकारले

देशोन्नती वृत्तसंकलन

**चंदीगडः** हरियाणा विधानसभा निवडणुकीचा निकाल आज समोर येतोय. या निवडणुकीत हिसार मतदारसंघातून भारतातील सर्वात श्रीमंत महिला म्हणून ख्यातनाम असलेल्या सावित्री जिंदल या विजयी झाल्या आहेत. विशेष म्हणजे भाजपने सावित्री जिंदल यांना उमेदवारीचे तिकिट नाकारले होते. त्यामुळे सावित्री यांनी अपक्ष उमेदवारी लढवत दणदणीत विजय संपादित केला आहे. सावित्री जिंदल यांनी काँग्रेसचे उमेदवार राम निवास रारा यांना २० हजार मतांनी पराभूत केले आहे.

सावित्री जिंदल या जिंदल ग्रुपच्या अध्यक्षा आहेत. त्यांनी हिसार विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला होता. त्यांनी उमेदवारी अर्जासोबत निवडणूक आयोगाला दिलेल्या शपथपत्रात आपल्या बँक खात्यात किती पैसे जमा आहेत, या विषयी माहिती दिली होती. त्या शपथपत्रानुसार, सावित्री जिंदल यांच्या बँक खात्यात ४.०९ कोटी रुपये जमा आहेत.

### भाजपने उमेदवारी नाकारल्याने अपक्ष निवडणूक लढवली

सावित्री जिंदल यांचे पुत्र खासदार नवीन जिंदल यांनी मार्च महिन्यात भाजप पक्षात प्रवेश केला होता. त्यांनी कुरुक्षेत्र येथून लोकसभा निवडणूक लढवत विजय संपादित केला होता. नवीन जिंदल यांनी भाजपात प्रवेश करताच तीन दिवसांनी माजी मंत्री सावित्री जिंदल यांनी भाजपात प्रवेश केला होता.

### निवडणूक लढवली व विजय मिळवला



फोर्ब्सच्या आकड्यांनुसार, सावित्री जिंदल यांची सप्टेंबर २०२४ पर्यंत ३.६५ लाख कोटी रुपयाची संपत्ती होती.

# मुस्लिमांच्या बालेकिल्ल्यात भाजपच्या 'रणरागिणी'चा 521 मतांनी विजय!

देशोन्नती वृत्तसंकलन

**किश्तवाडः** जम्मू-काश्मीरमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीचे निकाल लागले आहेत. या निवडणुकीत अनेक जागांची चर्चा झाली. भाजपने मुस्लीम लोकसंख्या मोठी असणाऱ्या किश्तवाड मतदारसंघातून शगुन परिहार यांना उमेदवारी दिली होती. पहिल्यांदाच निवडणूक लढवलेल्या शगुन यांनी रोमहर्षक विजय मिळवला असून त्यांनी नॅशनल कॉन्फरन्सचे उमेदवार सज्जाद अहमद किचलू यांचा अवघ्या ५२१ मतांनी पराभव केला आहे.शगुन यांना २९,०५३ तर सज्जाद अहमद यांना २८,५३२ मते मिळाली. तिसऱ्या क्रमांकावर राहिलेल्या फिरदौस अहमद यांना केवळ ९९७ मते मिळाली. अशाप्रकारे या मुस्लिमबहुल जागेवर निकराच्या लढतीत शगुन परिहार यांनी ५२१ मतांनी विजय मिळवत भाजपला ठशगुन' दिला आहे. जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीत भाजपला जरी सत्ता मिळाली नसली तरी त्यांनी ९० जागांपैकी २५ हून अधिक जागा जिंकल्या आहेत.

**किश्तवाडमध्ये शगुन परिहार यांची बाजी**

# साहित्यिकांनी दबाव निर्माण करावा

## राज ठाकरे : पुणे येथे साहित्य संमेलन

पुणे/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्राची आज सर्कस झाली आहे. राजकारणाच्या क्षेत्रात सध्या बोलल्या जाणाऱ्या भाषेला धरबंध राहिलेला नाही. अशा परिस्थितीत नाठाळ राजकारण्यांचे कान धरून त्यांना वठवणीवर आणण्याचे, खडे बोल सुनविण्याचे काम साहित्यिकांनी करावे, असे मत नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी व्यक्त केले. राजकारणी व्यक्तींना साहित्य संमेलनांमध्ये साहित्यिकांचे विचार ऐकायला बोलवावे, बोलायला नको असे सांगून पूर्वीच्या मराठी साहित्यिकांच्या अंगात, मनात मराठी बाणा रुजलेला दिसत होता, परंतु ती धमक आज कमी झालेली जाणवते, अशी टिप्पणीही त्यांनी केली.

सरहद, पुणे आयोजित अखिल भारतीय साहित्य महामंडळाच्या ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या बोधचिन्हाचे अनावरण आज (दि. ७) राज ठाकरे यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सभागृहात कार्यक्रम झाला. महाराष्ट्राची ओळख दर्शविणारी राजमुद्रा व लेखणी असे बोधचिन्हाचे स्वरूप आहे. दिल्ली येथे दि. २१ ते २३ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत साहित्य संमेलन होत आहे.




सरहद पुणेचे अध्यक्ष संजय नहार, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, सुनीताराजे पवार, विनोद कुलकर्णी, साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, डॉ. श्रीपाल सबनीस, लक्ष्मीकांत देशमुख, साहित्य महामंडळाचे कोषाध्यक्ष प्रकाश पागे, गुरय्या स्वामी, डॉ. शैलेश पगारिया आदी मंचावर होते.

ठाकरे पुढे म्हणाले, महाराष्ट्र हा देशाला दिशा देणारा आहे, असे आपण म्हणत आलो आहोत पण सद्यस्थितीत महाराष्ट्रातील राजकारणाची भाषा अत्यंत खालच्या थराला गेली आहे. अशा परिस्थितीत साहित्यिकांनी सामाजिक चळवळ उभी करण्याची गरज आहे. साहित्यिकांनी ट्रोल होण्याचा विचार न

पान २ वर...

# अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी मुंडे धावले

## जीवदान: ताफ्यातील वाहनातूनरुग्णास पोहोचविले हॉस्पिटलमध्ये

औरंगाबाद/पुण्यभूमी प्रतिनिधी

कृषी मंत्री धनंजय मुंडे हे आज छत्रपती संभाजीनगर येथील कामकाज आटोपून समृद्धी महामार्गाने मुंबईकडे जात असताना संभाजीनगर शहरालगतच्या हरसुल–सावंगी या या टोल नाक्याजवळ झालेल्या अपघातात जखमी झालेल्या लोकांच्या मदतीसाठी धनंजय मुंडे धावले.

धनंजय मुंडे हे समृद्धी महामार्गाकडे जात असताना त्यांना अपघात झाल्याचे लक्षात आले. एक पुरुष व एक महिला मोटरसायकल वरून जात असताना एका वाहनाने त्यांना जोराची धडक दिली, त्यात दोघेही जखमी झाले असून त्यांच्या शरीरातून मोठा रक्तस्त्राव होत होता. धनंजय मुंडे यांनी तातडीने आपल्या वाहनांचा ताफा थांबवला. स्वतःचा स्टाफ आणि जवळ आज उभ्या असणाऱ्या माणसांच्या मदतीने या जखमींना आपल्या ताफ्यातील सुरक्षेचे पोलीस वाहन उपलब्ध करून



दिले व गाडीत रुग्णांना घेऊन तातडीने घाटी हॉस्पिटलमध्ये जाण्याची सूचना केली.माझ्यासोबत

पान २ वर...

# कड्यात आज होम मिनिस्टर खेळ

कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

येथील राजे शिवाजी नवरात्र उत्सव मंडळाच्या वतीने होम मिनिस्टर खेळ पैठण ीचा या कार्यक्रमाचे गुरुवार दि. १० ऑक्टोबर रोजी कडा येथे आयोजन करण्यात आले आहे.

नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने कडा येथील राजे शिवाजी नवरात्र उत्सव मंडळाच्या वतीने महिलांसाठी होम मिनिस्टर खेळ पैठणीचा या भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवारी कडा येथील श्रीराम पेठेत संध्याकाळी सात वाजता हा कार्यक्रम होणार आहे. नितीन गवळी हे या कार्यक्रमाचे सादरीकरण करणार असून विजेती महिलेस पैठणी हे पहिल्या क्रमांकाचे बक्षीस असून कुलर , मिक्सर , इस्त्री यासारखे इतर बक्षीस असणार आहेत. त्याशिवाय कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या प्रत्येक महिलेस हमखास भेटवस्तू मंडळाकडून दिली जाणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त महिलांनी या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन संयोजकांकडून करण्यात आले आहे.

# रिपाइं सर्व जाती धर्मीयांचा पक्ष

## सुरेंद्र थोरात : वारी व हनुमान वाडीत रिपाइंची शाखा



कोपरगाव/पुण्यभुमी प्रतिनिधी आर पी आय आठवले पक्षाचे तालुकाअध्यक्ष अनिल रणनवरे यांच्या नेतृत्वाखाली रिपाइं (आठवले ) पक्षाची कोपरगाव तालुक्यातील वारी तसेच हनुमान वाडी या दोन शाखा फलक अनावरण सोहळा पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुरेंद्र थोरात यांच्या हस्ते करण्यात आले . या वेळी राज्यसचिव दीपक राव गायकवाड , शहराध्यक्ष सोमनाथ लोहकरे , मातंग जिल्हाध्यक्ष मोहन आव्हाड , श्रीरामपूर शाराध्यक्ष विजय पवार , बेलापूर ग्रामपंचायत सदस्य रमेश अमोलिक , रशिद शेख , मुस्लिम आघाडी तालुकाध्यक्ष पप्पू सैय्यद , तालुका उपाध्यक्ष किशोर मैन्द , शहरउपाध्यक्ष अनिस शेख , तालुका उपाध्यक्ष अकील शेख, शहर उपाध्यक्ष अजीत कुशर , शहर उपाध्यक्ष अमोल थोरात , मुस्लिम आघाडी शहरउपाध्यक्ष अस्लम शेख , शुभम भालेराव आदी शेकडो कार्यकर्ते उपस्थित होत .या वेळी रिपाइं चे जिल्हाध्यक्ष सुरेंद्र थोरात यांनी आपले मनोगत व्यक्त

# बीडमध्ये उभा राहणार जिल्हा उद्योग भवन!

## विकास: धनंजय मुंडेंच्या मागणीला आले यश

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

केंद्र व राज्य शासनाच्या औद्योगिक विकासाच्या धोरणाला अनुसरून बीड जिल्ह्यामध्ये उद्योग उभारणी बाबतच्या सर्व सेवा सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध व्हाव्यात या दृष्टीने जिल्ह्याचे अध्ययवत व सर्व सोयी युक्त असे उद्योग भवन असावे, याबाबतची मागणी जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांच्याकडे केली होती, आपल्या मित्राची मागणी उदय सामंत यांनी मान्य केले असून बीड जिल्ह्यात सर्व सोयुक्त अध्यायावत उद्योग भवन उभारण्यासाठी १४ कोटी ७० लाख रुपयांच्या आराखड्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील उद्योजकांना एकाच ठिकाणी उद्योग उभारणी बाबतच्या सर्व सेवा मिळाव्यात या दृष्टीने हे उद्योग भवन अत्यंत उपयुक्त ठरणार असून पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या मागणीला अनुसरून सात जून रोजी झालेल्या बैठकीत उदय सामंत यांनी याबाबतचा प्रस्ताव मागवला होता. सदर उद्योग भवन

पान २ वर...

# विद्यार्थिनींनो वेळेवर संपर्क करावा

## पोनि धनंजय ढोणे :महिला महाविद्यालयात संवाद



परळी/ पुण्यभूमी प्रतिनिधी

विद्यार्थिनीनी घाबरून न जाता वेळेवर पोलीसांशी संपर्क करावा संपर्क करणारांची नावे गुप्त ठेवली जातात असे प्रतिपादन संभाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे यांनी केले. ते लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात विद्यार्थिनींशी संवाद साधताना बोलत होते.

लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व संभाजीनगर पोलीस ठाण्याच्या वतीने विद्यार्थिनींशी संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा प्रसाद देशमुख, प्राचार्या डॉ विद्या देशपांडे, प्रा डॉ विनोद जगतकर उपस्थित होते.यावेळी पुढे बोलताना श्री ढोणे म्हणाले की, विद्यार्थिनींनी महाविद्यालयात येताना जाताना कोणी त्रास देत असेल तर सहन करु नये वेळेवर पोलीसांशी संपर्क करावा, तुम्ही जर संपर्क केला नाही तर तुम्हाला आणखी जास्त त्रास होवू शकतो, तसेच तात्काळ ११२ नंबर वर संपर्क साधावा या नंबरवर संपर्क केला तर पाच ते दहा मिनिटात आपल्याला जाग्यावर पोलीस प्रशासनाची मदत मिळेल. तुम्ही उद्याच्या

# नांदेड–पनवेल गाडीच्या बोगींची संख्या वाढवून परळी मार्गे ईतर ठिकाणी रेल्वे सुरु करा

## जी.एस.सौंदळे : प्रशासनास दिले निवेदन

परळी/ पुण्यभूमी प्रतिनिधी

द्वादश पंचम ज्योतीर्लिंग वैद्यनाथ क्षेत्र परळी मार्गे पुणे– पनवेल जाणा–या नांदेड एक्सप्रेस रेल्वे गाडीच्या प्रवाशी व स्लीपर तसेच ए.सी.बोगींची संख्या तात्काळ वाढवून या रेल्वेने दाटीवाटीने प्रवास करणा–या प्रवाशांची गैरसोय तात्काळ दुर करून परळी मार्गे पुणे,मुंबई,नागपुर,तिरूपती,अयोध्या,वाराणसी,गोवा व ईतर ठिकाणी रेल्वे सुरू करण्याची मागणी दक्षिण मध्य रेल्वेचे विभागिय व्यवस्थापक श्री.भरतेशकुमार जैन परळी रेल्वे स्थानक येथे तपासणीनिमित्त बुधवार दि.९ ऑक्टोंबर रोजी आले असताना रेल्वे प्रवाशी संघटनेचे अध्यक्ष जी.एस.सौंदळे यांच्यासह विविध राजकीय पक्षांच्या पदाधिकारी व महाराष्ट्र प्रदेश प्रवासी महासंघ बीड जिल्हा व प्रवाशांच्यावतीने करण्यात आली.




नांदेड–पनवेल रेल्वेगाडी च्या बोगी वाढवण्याच्या मागणीसह प्रवासी जनतेच्या व्यापक हिताच्या दृष्टीने काही महत्वपूर्ण मागण्या निवेदनात करण्यात आल्या यामध्ये मछलीपट्टणम –बीदर, सिकंद्राबाद–बीदर इंटरसिटी,यशवंतपुर–बीदर एक्सप्रेस,पाटणा–पूर्णा,रायचूर–परभणी रेल्वे परळी–वैजनाथ पर्यंत त्वरीत विस्तारीत करावी.दिवाळी सणानिमित्त परळी–वैजनाथ मार्गे सिकंदराबाद– छ.संभाजीनगर–मुंबई तसेच पुणे व ईतर ठिकाणी विशेष रेल्वे सुरू करावी.'पूर्णा–परळी' रेल्वे परत जाताना बहुअंशी रिकामीच असते त्या ऐवजी ती लातूर– धाराशिव किंवा उदगीर–बीदर पर्यंत विस्तारित करावी.अमरावती –पुणे व कोल्हापुर नागपुर रेल्वे

पान २ वर...

# महेबूबिया, अंजुमन एज्युकेशन सोसायटीच्या वतीने

## स्पर्धा: सीरत उन नबी' कार्यक्रमाचा समारंभ

परळी पुण्यभूमी/प्रतिनिधी

लोकनेते गोपीनाथ राव मुंडे नटराज रंग मंदिर येथे सोमवार, ७ सप्टेंबर २०२४ रोजी 'सीरत उन नबी' सोहळ्यातील विजेत्यांसाठी भव्य पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आला होता.महेबूबिया एज्युकेशन सोसायटीचे शेख ख्वाजा शेख महेताब यांच्या अध्यक्षतेखाली भव्य पारितोषिक वितरण समारंभ पार पडला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मौलाना रफिउद्दीन अश्रफी होते. सय्यद हनिफ सय्यद करीम उर्फ बहादुर भाई जे या चार दिवसीय'सीरत उन नबी' या सोहळ्याचे प्रेरणादायी व्यक्तीमत्व होते यांनीया कार्यक्रमातील सर्व पाहुण्यांचे टीं ी स्वागत केले.



या कार्यक्रमाचे पाहुणे मौलाना रफीउद्दीन साहेब म्हणाले की, पैगंबर (स.) यांचे जीवन नम्रता, धर्मनिष्ठा आणि अल्लाहप्रती भक्तीचे एक कालातीत उदाहरण आहे, जे जगभरातील कोट्यवधी लोकांना धार्मिकता आणि करुणेसाठी प्रयत्न करण्याची प्रेरणा देते. सय्यद हनिफ सय्यद करीमउर्फ बहादुर भाई यांनी मुहम्मद (झइणक) चे जीवन आणि शिकवणी वैयक्तिक आणि सामूहिक जिवनासाठी निर्णायक आहे यावर जोर दिला. प्रश्नमंजुषा कार्यक्रम आणि 'सिरत स्पर्धा' परीक्षांसारख्या नाविन्यपूर्ण मार्गाने भावी पिढ्यांना प्रेषित मुहम्मद (स.) यांचे जीवनाचे अध्ययन करण्यासाठी अशा प्रकारचे कार्यक्रम होणे काळाची गरज असल्याचेही ते म्हणाले. जेणेकरून ते त्यांचे 'दीनी' ज्ञान वाढवू शकतील. अंजुमन एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष शेख इलियास अहेमद सिराज अहेमद आणि अंजुमन एज्युकेशन सोसायटीचे सचिव सय्यद यासीन सय्यद हनिफ, महेबूबिया एज्युकेशन सोसायटीचे सहसचिव सय्यद इस्माईल सय्यद करीम आणि दोन्ही सोसायटीचे सर्व सदस्य आणि दोन्ही शाळांचे सर्व मुख्याध्यापक मंचावर उपस्थित होते. मान्यवरांच्या भाषणानंतर प्रश्नमंजुषा स्पर्धा नात, भाषणे व लेखी परीक्षेतील विजेत्यांना रोख पारितोषिक वितरण, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले. रोख २१००० रु. अ श्रेणीमध्ये इमदादुल उलूम हायस्कूलला प्रथम पारितोषिक देण्यात आले तर २१०००

पान २ वर...

## राजेभाऊ फड : भक्तिभावाने झाले नतमस्तक

# अध्यात्मिक सहवासाने मिळाले नवचैतन्य

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी अनेक कार्यकर्त्यांना सोबत घेऊन, जिल्हातील अनेक गडाचे यथोचित दर्शन घेतले.नियोजित दौऱ्याच्या सुरुवातीस सकाळी परळी तालुक्यातील कन्हेरवाडी येथील माजी आमदार स्व.रघुनाथराव मुंडे यांच्या समाधीस्थळी नतमस्तक झाले यावेळी गावातील अनेक नागरिकांसह कार्यकर्ते उपस्थित होते.

त्यानंतर पांगरी(गोपीनाथ गड) येथील गोपीनाथ गडावर जाऊन स्व.लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या समाधीचे दर्शन घेऊन राजेभाऊ फड पुढे मार्गस्थ झाले त्यानंतर, श्री क्षेत्र भगवानगड येथील



राष्ट्रसंत भगवान बाबांच्या चरणी नतमस्तक झाल्या नंतर, बाबांच्या दर्शनाने व गडाच्या अध्यात्मिक वारसा व सहवासाने नवचैतन्य प्राप्त झाले सामाजिक व राजकीय कार्य करण्याची ऊर्जा बाबांच्या दर्शनाने मिळाली असे प्रतिपादन

पान २ वर...

# आरोग्य कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस

## तत्पर: आरोग्य केंद्र कुलुप बंद प्रकर

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव तालुक्यातील बनोटी आरोग्य केंद्राला कर्तव्यावर हजर न राहता आरोग्य केंद्राला थेट कुलुप लावल्या च्या प्रकरणी सखोल चौकशी साठी समिती गठित करून दोषी आढळलेल्या त्या आरोग्य कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा बजावून एक दिवस वेतनात कपात करण्याची कारवाई चा प्रस्ताव आरोग्य उपसंचालक यांचेकडे सादर करणार असल्याची माहिती बुधवारी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ अभय धानोरकर यांनी दिली आहे यामुळे आरोग्य विभागात दांडी बहाद्दर कर्मचाऱ्याचे धाबे दणाणले आहे

आठवड्याचा पहिल्या दिवशी सोमवारी

पान २ वर...




### आरोग्य कर्मचाऱ्याची मुजोरी सुरूच

सोमवारी आरोग्य केंद्र बंद ठेवण्याचा चक्क लावला फलक दरम्यान रविवारी बाह्य रुग्ण विभाग सुरू ठेवून सोमवारी आरोग्य केंद्र बंद ठेवण्यात येण्याचा निर्णय चुकीचा आहे परंतु तरीही आरोग्य कर्मचाऱ्यांनी बुधवरी चक्क बाहय रुग्ण विभाग सुरू ठेवण्याचा फलक लावून सोमवारी बंदच राहणार असल्याचे फलक आरोग्य केंद्रात लावला आहे